साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १३.११.२०२६ | अंक नं. १८८ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चाहूल लागता थंडीची... आठवते दुकान जरीवालाची
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

राजपाल खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर 02425-222226 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552780

।। जय आनंद ।।
।। जय महावीर ।।
समर्पण चातुर्मास... अहिल्यानगर
समर्पण-सर्व कल्याण
स्नेह निमंत्रण
राष्ट्रसंत आचार्यसम्राट आनंदऋषिजी म. सा. की कर्मभूमि पर,
महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषिजी म. सा.
के प्रेरणासे एवं अर्हम् विद्या प्रणेता, महाराष्ट्र केसरी
उपाध्याय प्रवर पूज्य प्रवीणऋषिजी म. सा.
के सान्निध्य में, सकल जैन समाज, अहिल्यानगर की ओर से
समाज रत्न सम्मान
श्री. सौरभ प्रमिलाताई हेमराजजी बोरा
समाज गौरव सम्मान
श्री. अशोक (बाबुशेठ) सिमरतमल बोरा
श्री. सौरभजी बोरा एवं श्री. अशोक (बाबुशेठ) बोरा
को पुरस्कार से सम्मानीत किया जायेगा ।
इस गौरवपूर्ण अवसरपर आपकी उपस्थिती सादर प्रार्थनीय है ।
विनीत : समर्पण चातुर्मास समिती । सौरभ बोरा मित्र परिवार (भोजन कमिटी)
कार्यक्रम समय : दि. १४ नोव्हेंबर को सुबह ९ बजे
स्थान: आनंद समवशरण, आनंद धाम समीप, अहिल्यानगर.

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

फेब इंडियन
हेण्डलूम एण्ड हेण्डीक्राफ्ट
आर्ट & क्राफ्ट एक्झीबीशन
आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही दुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे
• चंदेरी आणि पटोरा साडी
• बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स
• पॅच वर्क • पश्चिम बंगाल साडी
• लखनवी चिकन • कोटा सिल्क
• काश्मीर सूट आणि पश्मिना शाल
• जयपुर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी
• भदोई कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट
BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ११.०० ते रा. १०.०० पर्यंत
Diwali Special
पार्किंग व एन्ट्री फ्री
ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक
तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

आमचे मार्गदर्शक
भारतीय जनता पार्टीचे नेते
मा. अभयजी आगरकर साहेब
आपणांस जन्मदिनाच्या अनंत शुभेच्छा...!
शुभेच्छुक
पै. मयुर बोचुघोळ
अध्यक्ष, भाजपा मध्यमंडल अहिल्यानगर
TATYA
उदंड आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा...!

Career Ki Shuruvat DISHA ke saath
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE
15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER
Get Any Course Just in 2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY, BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, HTML.
दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769
जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769

''तुमचा वाढदिवस तितकाच खास असावा जितकं तुम्ही आमच्यासाठी खास आहात
''तुमच्या चेहऱ्यावरचं हसू असंच कायम राहो, तुमच्या प्रत्येक स्वप्नाला पूर्णत्व मिळो.''
सर्वांचे लाडके मित्र
महेशभाऊ सुरसे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..
धिरज पोखरणा
DP पोखरणा मल्टी बिझनेस ग्रुप संपूर्ण महाराष्ट्र
अमित विधाते
आयुर्वेदा लाकडी घाणा तेल, अहिल्यानगर
विक्रम जी.नारंग
न्यू प्रिया हॅण्डलूम, सारडागल्ली,अहिल्यानगर
अनमोल जैन
(पोखरणा-जैन बिल्डर्स । डेव्हलपर्स) संचालक- आर्किटेक्ट्स इंजीनियर्स सर्वेयर्स एसोसिएशन, अहिल्यानगर)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

तब्बल ४० वर्षांनंतर अहिल्यानगरमध्ये राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा

२८ नोव्हेंबरपासून स्पर्धा; राज्यातील ४८ संघांचा सहभाग

नगर - तब्बल चार दशकांनंतर अहिल्यानगर शहराला पुन्हा एकदा पुरुष व महिला गटातील राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचे यजमानपद मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि अहमदनगर जिल्हा खो-खो असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली एकलव्य क्रीडा मंडळ, निर्मलनगर यांच्या वतीने ६२ वी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालय, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती स्पर्धा समितीचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांनी दिली.



अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेची माहिती देताना स्पर्धा समितीचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप. यावेळी स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. (छायाचित्र - लहू दळवी)

सन १९८६ मध्ये सहकार क्रीडा मंडळ, अहमदनगर यांच्या वतीने पुरुष व महिला गटातील राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानंतर सुमारे ४० वर्षांनी पुन्हा एकदा या स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगरमध्ये होत आहे. या स्पर्धेत राज्यातील पुरुषांचे २४ आणि महिलांचे २४ असे एकूण ४८ संघ सहभागी होणार असून, सुमारे ७२० खेळाडूंसह प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक, पंच, तांत्रिक समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र खो-खो संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी चार स्वतंत्र मैदाने तयार करण्यात येणार असून, दिवसा आणि रात्री विद्युत रोषणाईत सामने खेळविण्यात येतील. प्रेक्षकांसाठी तीन ते चार हजार आसनक्षमतेची गॅलरी उभारण्यात येणार आहे. सहभागी खेळाडूंच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात येणार असून, चारही दिवस जिल्हा रुग्णालयाच्या माध्यम ातून वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. स्पर्धेतील सामन्यांचे आकाशवाणी, यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि अन्य सोशल मीडिया माध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी मैदान उपलब्ध करून देण्याकामी रामचंद्र दरे, विवेक भापकर, अॅड. विश्वासराव आठरे पाटील आणि जयंत वाघ यांनी सहकार्य केले आहे. पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, डॉ. सुजय विखे पाटील, नगरसेवक निखिल वारे, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे आणि महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या सहकार्याने स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभासाठी महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आमदार संग्राम जगताप, डॉ. सुजय विखे पाटील, संघटनेचे उपाध्यक्ष सी.ए. अशोक पितळे, सचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव आणि अहमदनगर जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष अॅड. विश्वासराव आठरे पाटील उपस्थित राहणार आहेत. समारोप व पारितोषिक वितरण समारंभ पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

अहमदनगर जिल्हा खो-खो संघटनेची स्थापना १९७२ मध्ये कै. पी.के. रत्नपारखी, दिनुभाऊ कुलकर्णी, व्ही.ए. निवसरकर, एम.व्ही. बर्डे आणि बी.आर. मोरे यांनी केली. त्यानंतर डॉ. विलास कवळे, अशोक पितळे आणि निर्मलचंद्र थोरात यांनी संघटनेचे कामकाज पाहिले. सध्या अॅड. विश्वासराव आठरे पाटील, विकास परदेशी आणि गौरव पितळे हे संघटनेची जबाबदारी सांभाळत आहेत.

खो-खो क्षेत्रात अहमदनगर जिल्ह्याची गौरवशाली परंपरा असून, जिल्ह्याने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविले आहेत. पुरुष गटातील एकलव्य पुरस्कार निर्मलचंद्र थोरात, कुमार गटातील वीर अभिमन्यू पुरस्कार आदित्य कुदळे व तेजस मगर, तर किशोर गटातील भरत पुरस्कार राहुल चव्हाण यांनी प्राप्त केला आहे. महिला गटात राणी लक्ष्मीबाई पुरस्कार श्वेता गवळी, कुमारी गटातील जानकी पुरस्कार नंदिनी देशमुख व श्वेता गवळी, तर किशोरी गटातील वीरबाला पुरस्कार श्वेता गवळी व मयुरी मुत्याल यांनी मिळविला आहे.

निर्मलचंद्र थोरात, श्वेता गवळी, मयुरी मुत्याल आणि निकिता मरकड यांनी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्र संघाचे कर्णधारपद भूषविले आहे. सुधीर चपळगावकर यांनी आंतरविद्यापीठ स्पर्धेत पुणे विद्यापीठ संघाचे नेतृत्व केले आहे. पुरुष गटात अशोक पितळे, नंदकुमार पवार, निर्मल थोरात, श्रीकांत निंबाळकर, सुधीर चपळगावकर, विकास परदेशी आणि आदित्य कुदळे, तर महिला गटात विद्या जोगळेकर, नंदिनी कुलकर्णी, सुरेखा काबरा, मुक्ता गायकवाड, वंदना देशमुख, वैशाली बोतर्डीकर, कीर्ती गुंदेचा, अंजली लांडगे, नंदा शेलार, श्वेता गवळी, मयुरी मुत्याल आणि निकिता मरकड यांनी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळवून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील खो-खो खेळाडूंनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासह विविध प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त केले आहेत. जिल्ह्यात हा पुरस्कार सर्वप्रथम निर्मलचंद्र थोरात यांना मिळाला, तर त्यानंतर श्वेता गवळी हिनेही हा बहुमान मिळविला. श्वेता गवळी हिने दक्षिण आशियाई स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविले आहे. खो-खोच्या विविध वयोगटांत महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची कामगिरीही तिने केली आहे.

यावेळी अॅड. विश्वासराव आठरे, प्रा. सुनील जाधव, सुमतीलाल कोठारी, गौरव पितळे यांसह खेळाडू उपस्थित होते. यावेळी स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.

नगर-जामखेड रोडवर भीषण अपघातात एकाचा मृत्यू तर दोन जण गंभीर जखमी




सौरभ भळगट (मयत)

नगर - नगर - जामखेड रोडवर सारोळा बद्धी (ता.नगर) शिवारात भरधाव बोलेरो कॅम्पर वाहनाने रस्त्यावरील दुभाजकाला धडक देऊन झालेल्या अपघातात एका सहप्रवाशाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातात अन्य दोघे जण गंभीर जखमी झाले. या अपघातात बेंगलोर येथील आयटी कंपनीत नोकरीस असलेले सौरभ जितेंद्र भळगट (वय ३०, रा. जीत बंगला, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) यांना दुखापत झाल्यामुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आजी, आई वडील, पत्नी, काका, भाऊ, बहीण असा परिवार आहे. तसेच वाहनातील इतर प्रवासी ऐश्वर्या मोरे व प्रसन्न डांगे हे दोघेही जखमी झाले असून, बोलेरो गाडीचे देखील नुकसान झाले आहे.

७ नोव्हेंबरला रात्री १० वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. आरोपी चालक शौनिक रविंद्र खर्डे (रा. झोपडी वॅन्टींग, अहिल्यानगर) हा त्याच्या ताब्यातील बोलेरो कॅम्पर वाहन (क्र.एम एच १६ सीडी २७६०) घेऊन जात असताना अपघात झाला. या प्रकरणी डॉ. ट्विकल दिनेश खंडेलवाल (वय ३०, रा. आनंद कॉलनी, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर) यांनी ११ नोव्हेंबरला दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुर्यभान शिंदे यांचे दु:खद निधन



नगर - समर्थनगर, मोरया पार्क फेज टु बोल्हेगाव येथील रहिवासी सुर्यभान मारुती शिंदे (वय ६३) यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

शकुंतलाबाई वाळुंजकर यांचे वृद्धापकाळाने निधन



भिंगार - ब्राम्हणगल्ली दत्तमंदीर समोरील रहिवासी कॅन्टोन्मेंट शाळेतील निवृत्त शिक्षिका श्रीमती शकुंतलाबाई मधुकर वाळुंजकर (वय ८९) यांचे ८ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

गिरीश व एडीसीसी बँकेतील जनरल मॅनेजर सुधीर वाळुंजकर यांच्या त्या मातोश्री होत.

श्रीमती विजयाबाई छाजेड यांचे निधन



श्रीरामपूर - येथील श्रीमती विजयाबाई शांतीलाल छाजेड (वय ८४) यांचे दु:खद निधन झाले.

'विजया राईस'चे मालक संजय व संतोष छाजेड यांच्या मातोश्री, जवरीलाल, सुभाष, राजेंद्र व विजय छाजेड भावजई, अक्षय, आनंद, कु. पुजा, कु.आरती छाजेड यांच्या आजी होत.

गोपीनाथ पोटे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील गोपीनाथ त्रिंबक पोटे (वय ८४) यांचे १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्री दत्त किराणा अँण्ड जनरल स्टोअर्सचे मालक सुभाष पोटे व संजय पोटे यांचे वडील, श्रीरामपूर न.प.च्या नगरसेविका सौ.वैशाली सुभाष पोटे यांचे सासरे होत.

सौ.शांताबाई कोकरे यांचे निधन



श्रीरामपूर - येथील सौ. शांताबाई महादेव कोकरे (वय ७६) यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महादेव धर्माजी कोकरे यांच्या पत्नी, अण्णासाहेब, राजेंद्र, सोमनाथ व रामचंद्र कोकरे यांच्या मातोश्री होत.

विशाल (बबलू) मगर यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर - खोकडपुरा येथील रहिवासी विशाल बबन मगर (वय ३१) यांचे अल्पशा आजाराने ११ नोव्हेंबर रोजी निधन झाले.

त्यांच्यावर ११ नोव्हेंबर रोजी कैलासनगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, भाऊ असा परिवार आहे.

सुशीलाबाई बोहरा यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - दिगंबरचे समाजातील सुशीलाबाई बोहरा (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, जावई, नातवंडे, पुतणे असा परिवार होता.

रोटरी क्लब श्रीरामपूरचे माजी अध्यक्ष प्रेमचंद बोहरा यांच्या पत्नी तर दिगंबर जैन समाजाचे माजी विश्वस्त प्रशांत बोहरा यांच्या मातोश्री, नेमिचंद अशोक बोहरा यांच्या भावजई तर मंजुषा चांदीवाल छत्रपती संभाजीनगर, किरण सेठी इंदौर, वैशाली ठोले छत्रपती संभाजीनगर यांच्या मातोश्री, सौ. रीया मुथा पुणे, कु. निधि बोहरा यांच्या आजी, अतुल, संदीप, पंकज यांच्या काकू होत. सुशीलाबाई बोहरा यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले आहे.

जिल्हा बँक अध्यक्ष निवडणूकीच्या वेळी चोरट्यांनी साधला डाव; गर्दीत अनेकांची पाकिटे मारली, एका चोरट्याला रंगेहाथ पकडले

नगर - अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष- उपाध्यक्ष पदाची निवडणुक १२ नोव्हेंबर रोजी दुपारी पार पडली. या दिवशी बँकेच्या आवारात आणि निवडीनंतर झालेल्या मिरवणुकीतील गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्यांनी अनेकांची पाकिटे मारल्याची घटना समोर आली आहे, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र फिर्यादी दाखल झाल्या आहेत. यातील एका चोरट्याला रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. सुजय विखे पाटील आणि उपाध्यक्षपदी रणजितसिंह देशमुख यांची १२ नोव्हेंबर रोजी एकमताने निवड झाली. यावेळी जिल्हा बँकेच्या आवारात आणि परिसरात विखे, देशमुख समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. या निवडीनंतर परिसरातून विजयी मिरवणूकही काढण्यात आली होती. त्यावेळी प्रचंड गर्दी झाली होती. याच गर्दीत चोरट्यांनी संधी साधली. पहिल्या घटनेत ऋषिकेश सतीश ढवळे (वय २९, रा. आसामी मळा, हंगा, ता. पारनेर) आणि त्यांचा मित्र अक्षय विलास दळवी तसेच इतर नागरिक यांच्या खिशातील एकूण ६६ हजार रुपये रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी लांबवली असून त्यात ५०० व २०० रुपयांच्या नोटांचा समावेश आहे. दुसऱ्या घटनेत निशांत शिवाजी तरटे (वय २५, रा, पळवे, ता. पारनेर) यांच्या खिशातील १८ हजार ६०० रुपये चोरून सोबत मोबाईल फोन चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दिनेश जालिंदर डहाळे (वय २५, रा. बुरुडगल्ली, राहुरी) या संशयित आरोपीला फिर्यादीने नागरिक व पोलिसांच्या मदतीने रंगेहात पकडले असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. कोतवाली पोलिसांनी चोरट्यांसह पकडलेल्या आरोपीविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

सावेडी उपनगरात भर दिवसा नगरसेवकाच्या घरी चोरी; सोन्या चांदीचे दागिने व रोकडसह लाखोंचा ऐवज लंपास

नगर - सावेडी उपनगरात श्रीरामचौक परिसरात आणि अन्य ठिकाणी चोरट्यांनी १२ नोव्हेंबर रोजी भरदिवसा अनेक घरे फोडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज चोरून नेला आहे.

सावेडी उपनगरातील श्रीरामचौक परिसरात बायजाबाई सोसायटी, ज्ञानेश्वरनगर येथे राहणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक बाळासाहेब पवार यांचे घरही चोरट्यांनी सोडले नाही. पवार यांचे कुटुंबीय बहेगावी गेलेले होते. ते एकटेच घरी होते. ते ही दुपारी १२ च्या सुमारास घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. ही संधी साधत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरात उचकापाचक करत घरातील कपाटात ठेवलेले चार ते पाच तोळे सोन्याचे दागिने आणि काही रोकड चोरून नेली.

त्याच बरोबर त्यांच्या पाठीमागील बाजूस राहणारे अमोल सूर्यकांत झेंडे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी तीन ते चार तोळे सोन्याचे दागिने आणि ५२ हजार रुपये किमतीची रोकड चोरून नेल्याची घटना भर दुपारी घडली आहे. याशिवाय सावेडी उपनगरात अन्य ठिकाणीही चोऱ्या झाल्याचे समजते. या घटनेमुळे परिसरामध्ये खळबळ उडाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांचे पथक, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, श्वान पथक, तसेच ठसे तज्ञांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी करत पंचनामा केला आहे, सदर चोरटा चोरी करताना सीसीटीव्ही मध्ये कैद झाला असून त्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

याबाबत १३ नोव्हेंबर रोजी दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

फुले दांपत्याचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या कामास विलंब होत असल्याने १६ नोव्हेंबरपासून नगर शहरात 'बेमुदत आमरण उपोषण' करण्याचा इशारा

नगर - माळीवाडा वेशीतील फुले दाम्पत्यांच्या पुतळ्यांच्या उभारणीचे भूमिपूजन तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या हस्ते, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आणि आमदार संग्राम जगताप व इतरांच्या उपस्थितीत २७ जुलै २०२५ रोजी झाले होते. मात्र, भूमिपूजन होऊनही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.

माळीवाडा वेशीतील क्रांतीज्योती सावित्रीआई फुले आणि महात्मा फुले यांचे पूर्णाकृती पुतळे उभारण्याचे नियोजित असून, या कामात अतिक्रमणामुळे अडथळे निर्माण होत आहे. माळीवाडा वेस व परिसरातील सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे तातडीने हटवून पुतळे उभारणीचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समिती व अहिल्यानगर सकल माळी समाज संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती.

तसेच १५ नोव्हेंबर पर्यंत अतिक्रमणे न हटविल्यास १६ नोव्हेंबरपासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला होता. परंतु या कामी प्रशासनाने कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई केलेली दिसत नाही. अहिल्यानगर शहरामध्ये फुले दांपत्यांचे भव्यदिव्य स्मारक व्हावे. अशी मागणी अनेक वर्षापासून केली जात आहे. सर्व समाजाला शिक्षण देणाऱ्या महापुरुषांचे स्मारक होण्यासाठी आजही विलंब होत असल्याने फुले प्रेमींच्या भावना दुखावल्या गेले आहेत. म.फुले व सावित्रीआई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक



होण्यासाठी लढा उभारु असे प्रतिपादन क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समितीचे अध्यक्ष प्रा.माणिक विधाते यांनी केले आहे.

रंगारगल्ली येथील महाले मंगल कार्यालयात महात्मा फुले व सावित्रीआई फुले दाम्पत्यांच्या स्मारक उभारणीसाठी १६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या बेमुदत आमरण उपोषणा संदर्भात फुले प्रेमींची बैठक क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समिती व अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. यावेळी कृती समितीचे अध्यक्ष प्रा.माणिक विधाते, अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, खजिनदार विनोद पुंड, कृती समितीचे सचिव अशोक कानडे, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, बजरंग भुतारे, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, अॅड. अशोक गायकवाड, अॅड. अनिल गाडेकर, सकल माळी समाजाचे विश्वस्त संजय गारुडकर, डॉ.रणजीत सत्रे, सचिव अमोल भांबरकर, अनिल इवळे, कोअर कमिटी सदस्य राजेंद्र ताठे, प्रकाश इवळे, प्रकाश शिंदे, कॅप्टन सुधीर पुंड, चंद्रकांत पुंड, मच्छिंद्र फुलसौंदर, रोहित पठारे, मच्छिंद्र बनकर, माळी महासंघाचे उपाध्यक्ष मनोज भुजबळ, मनोज फुलसौंदर, नंदकुमार नेमाने, संजय ताजणे, रमेश चिपाडे, राजाराम चिपाडे, सुरेश जाधव, सुभाष गोंधळे, सुदाम बोरुडे, सुरेश कावळे, दत्तात्रय वारकड, दत्तात्रय शिंदे, रोहन डागवाले, राजेंद्र सांगळे, यश डागवाले, रोहिणी बनकर, सुरेखा घोलप, कल्याणी गाडळकर आदी उपस्थित होते.

किशोर डागवाले म्हणाले, फुले दांपत्याचे भव्य दिव्य स्मारक व्हावे. ही मागणी अनेक वर्षापासून केली जात आहे. फुले दांपत्याचे स्मारकाचे भूमिपूजन स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. यानंतर स्मारकाचे काम रखडले आहे. या संदर्भात स्मारकाच्या कामाला गती देण्यासाठी महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना वेळोवेळी निवेदन देण्यात आले आहे. परंतु प्रशासनाने याबाबत ठोस कारवाई न केल्याने कृती समिती व फुले प्रेमींनी १६ नोव्हेंबर पासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे. या आंदोलनासाठी जिल्ह्यातील फुले प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी बाळासाहेब भुजबळ म्हणाले, थोर समाज सुधारक महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी सर्व समाजासाठी शिक्षणाची द्वारे खुली केली आहेत. जिल्ह्यात फुले दांपत्यांचा भव्य दिव्य स्मारक व्हावे ही फुले प्रेमींची भावना असल्याने प्रशासनाने पूर्णाकृती पुतळे उभारण्याचे काम तातडीने हाती घ्यावे अन्यथा जिल्ह्यातील फुले प्रेमी मोठे आंदोलन उभारतील असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अमोल भांबरकर यांनी केले. विनोद पुंड यांनी आभार मानले.

ललिताबाई रायपिल्ले यांचे अल्प आजाराने निधन



नगर - रायगड सोसायटी गणेशनगर येथील रहिवासी श्रीमती ललिताबाई दत्तात्रय रायपिल्ले (वय ६५) यांचे १३ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे, २ मुली, जावई असा परिवार आहे. नितीन रायपिल्ले यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



अहिल्यानगर महानगरपालिकेचा गलथानकारभार चव्हाट्यावर

अहिल्यानगर महापालिकेने नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर नटराज हॉटेलच्या समोर रस्त्यावरच पाण्याचे लिकेज काढण्यासाठी मोठा खड्डा १३ नोव्हेंबर रोजी सकाळी जेसीबीने खोदला आहे. या ठिकाणी बॅरिकेट्स लावले परंतु ते बॅरिकेट्स त्या खड्ड्यात पडले आहेत. तेथे कुठलीही सुरक्षिततेची उपाय योजना महापालिकेने केलेली नाही. परिणामी अपघाताचा धोका निर्माण झालेला आहे. या खड्डा खोदाईमुळे या महामार्गावर सकाळपासूनच मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. तसेच वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झालेला आहे. महापालिकेने रस्ता खोदाई केली परंतु त्या ठिकाणी महामार्गावरील काम असल्याने ते तातडीने करणे गरजेचे असताना तेथे एकही कर्मचारी उपस्थित नसल्याने महापालिकेच्या या गलथान कारभाराचा फटका अनेक वाहनचालकांना बसत आहे. या खड्ड्यांमध्ये पडून एखाद्याचा दुर्दैवी अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण असा सवाल नागरिक आणि वाहनचालक उपस्थित करत आहेत. (छायाचित्र - लहू दळवी)

जुन्या वादातून तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला; केडगाव येथील घटना, तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - केडगाव परिसरातील शनी मंदिरजवळ जुन्या वादातून तिघांनी एका तरुणावर कोयत्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी पोलीस ठाण्यात ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अपुल रमेश काळे (वय २७, रा. कोतकर मळा, शास्त्रीनगर, शनी मंदिराजवळ, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. ९ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास फिर्यादी हे केडगाव येथील देवीच्या मंदिराशेजारी गोडाऊनजवळ गेले असताना, तिथे हर्षल विजय केदारे व दिपक अर्जुन शेलार हे थांबलेले होते. फिर्यादी हे दीपक केदारे यांच्याशी बोलत उभे असताना, दारूच्या नशेत असलेल्या हर्षल केदारे याने विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. फिर्यादीने त्याला दारू पिल्याचे व शिवीगाळ न करण्याचे सांगितल्यामुळे संतापलेल्या हर्षालाने त्यांना हाताने व चापटीने मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी घरी निघून आले व सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ते जेवण करत असताना दिपक शेलार आणि अनिकेत बाळासाहेब शिंदे हे त्यांच्या घरासमोर आले. त्यांनी फिर्यादीला बाहेर बोलावून हर्षल केदारे शनी मंदिराजवळ असल्याचे सांगत वाद मिटवण्यासाठी सोबत चलण्यास सांगितले. फिर्यादी त्यांच्यासोबत गेले असता, तिथे आधीच उपस्थित असलेल्या तिघांनी मिळून त्यांना तुला खूप माज आलाय का? असे म्हणत शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्यानंतर दीपक आणि हर्षल यांनी फिर्यादीचे हात धरून ठेवले, तर अनिकेत शिंदे याने त्याच्या जवळील कोयता फिर्यादीच्या डोक्यात पाठीमागे मारला. या हल्ल्यात फिर्यादीच्या डोक्यातून गंभीर रक्तस्त्राव होऊ लागल्याने तिथे जमलेल्या मुलांनी भांडण सोडवले. त्यानंतर फिर्यादीने डायल ११२ वर फोन करून पोलिसांना बोलावले. पोलिसांनी घटनास्थळी येऊन त्यांना सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचारासाठी दाखल केले. याप्रकरणी अपुल काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अनिकेत बाळासाहेब शिंदे, हर्षल विजय केदारे आणि दिपक अर्जुन शेलार (सर्व रा. शनी मंदिराजवळ, केडगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

गृहिणी

आरोग्य

हात धुणे एक सामाजिक जबाबदारी

हात धुणे ही क्रिया वरवर पाहता अत्यंत सामान्य आणि क्षुल्लक वाटते परंतु मानवी आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर तीच क्रिया जीवन आणि मरण यातील अंतर ठरवणारी इतकी महत्त्वाची ठरते. आपल्या हाताची रचना अशी आहे की आपण दिवसाच्या चोवीस तासांत हजारो वेळा वेगवेगळ्या पृष्ठभागांना स्पर्श करत असतो, सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत दाराची कडी, बसचा दांडा, पैसे, भाजी मंडईतील भाज्या, मोबाईल फोन, लॅपटॉप, शाळेचे बाक, कार्यालयातील फाईल्स या सगळ्यावर कोट्यवधी सूक्ष्म जंतू, विषाणू आणि जीवाणू असतात जे उघड्या डोळ्यांनी कधीच दिसत नाहीत. आपल्याला हात स्वच्छ दिसले तरी त्यावर चिकटलेले हे अदृश्य शत्रू आपल्या शरीरात प्रवेश करण्याची संधी शोधत असतात आणि ती संधी आपणच त्यांना देतो जेव्हा आपण न धुता जेवण करतो, लहान मुलांना भरवतो, पाणी पितो किंवा सहजपणे तोंडाला, नाकाला आणि डोळ्यांना हात लावतो. वैद्यकीय शास्त्रानुसार मानव दिवसातून सरासरी शेकडो वेळा नकळतपणे चेहऱ्याला हात लावतो आणि यातूनच सर्दी, फ्लू, विषाणूजन्य ताप, घशाचे खवखवणे, कावीळ, टायफॉईड, कॉलरा आणि जुलाब सारखे पोटाचे गंभीर आजार पसरतात. जागतिक आरोग्य संघटनेने देखील वारंवार सांगितले आहे की केवळ साबणाने योग्य पद्धतीने वीस ते तीस सेकंद हात धुतल्यास जवळपास ऐंशी टक्के संसर्गजन्य आजारांना आळा बसू शकतो, जे कोणत्याही महागड्या लसीपेक्षा किंवा औषधापेक्षा अधिक प्रभावी आणि स्वस्त आहे. हात धुण्याची योग्य वेळ देखील लक्षात घेणे गरजेचे आहे जसे की शौचाला जाऊन आल्यावर, जेवण बनवण्यापूर्वी आणि जेवण्यापूर्वी, बाहेरून प्रवास करून घरी आल्यावर, शाळेतून किंवा कामावरून परतल्यावर, प्राण्यांना हात लावल्यावर, कचरा टाकल्यावर, शिंकल्यानंतर आणि खोकल्यानंतर ही वेळा चुकवू नयेत. केवळ पाण्याने हात धुणे पुरेसे नसते तर साबणाचा वापर करणे गरजेचे आहे कारण साबणातील क्षार जंतूंच्या बाह्य आवरणाला तोडून त्यांना नष्ट करतात आणि पाण्याबरोबर वाहून नेतात. ही सवय लहान मुलांमध्ये लहानपणापासूनच रुजवली तर त्यांची प्रतिकारशक्ती वाढते, ते अधिक निरोगी आयुष्य जगू शकतात. स्वच्छ हात हे केवळ स्वतःपुरते मर्यादित नाहीत तर ती एक सामाजिक जबाबदारी आहे.

पाककला

तिरामिसू पेढा

साहित्य : मिल्क पावडर १ वाटी, कंडेन्स्ड मिल्क १/२ वाटी, ताजे क्रीम २ चमचे, क्रीम चीज किंवा मस्करपोन चीज २ चमचे, इन्स्टंट कॉफी पावडर १ चमचा, कोमट पाणी १ चमचा, कोको पावडर २ चमचे, बटर १ चमचा, वेलची पावडर १/४ चमचा

कृती : एका वाटीत कोमट पाण्यात कॉफी पावडर विरघळून घ्या. कढईत बटर गरम करून त्यात मिल्क पावडर, कंडेन्स्ड मिल्क आणि ताजे क्रीम घालून मंद आचेवर एकजीव करा. मिश्रण घट्ट होत आल्यावर त्यात विरघळलेली कॉफी, क्रीम चीज आणि वेलची पावडर घालून सतत ढवळत राहा. मिश्रण कढई सोडू लागले की गॅस बंद करून थंड होऊ द्या. थंड झाल्यावर हाताला थोडे बटर लावून लहान लहान पेढे वळून घ्या. तयार पेढ्यांवर चाळणीने कोको पावडर भुरभुरा. फ्रीजमध्ये अर्धा तास ठेवून थंडगार सर्व्ह करा.

वास्तू

मुलांच्या अभ्यासाची खोली

* मुलांच्या अभ्यासाची खोली ईशान्येला असावी. अभ्यास करताना तोंड पूर्वेला किंवा उत्तरेला असल्यास अभ्यासात लक्ष लागते आणि स्मरणशक्ती वाढते.

* पैशाची तिजोरी किंवा कपाट दक्षिण भिंतीला लागून ठेवावे आणि त्याचे तोंड उत्तरेकडे उघडेल असे ठेवावे. मुख्य दरवाजासमोर कचरा पेटी ठेवू नये.

सौंदर्य

मसूर डाळ रात्रभर दुधात भिजत घाला आणि सकाळी वाटून त्याची पेस्ट करा. यात थोडे मध टाका. हा पॅक आठवड्यातून दोन वेळा लावल्याने सुरकुत्या कमी होतात.

सल्ला

* मिक्सरच्या पात्याला धार येण्यासाठी मीठ वाटा.

* फ्रीजचा वास जाण्यासाठी लिंबाची फोड ठेवा. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

दैनिक पंचांग

शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६

पांडव पंचमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, पू.षा.२०।२५, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : कामात यश मिळेल आणि उत्साह वाढेल.

वृषभ : खर्च वाढेल पण महत्वाचे काम पूर्ण होईल. कुटुंबाची साथ मिळेल.

मिथुन : नवीन ओळखीचा फायदा भविष्यात होईल.

कर्क : मन थोडे अस्वस्थ राहील. संध्याकाळी चांगली बातमी मिळेल.

सिंह : मान सन्मान वाढेल. व्यवसायात मोठा लाभ होईल.

कन्या : दिवस धावपळीचा राहील. मुलांकडून आनंद मिळेल.

तुळ : अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : रागावर ताबा ठेवाल. वादापासून दूर राहाल.

धनु : भाग्याची साथ मिळेल. रखडलेली कामे पूर्ण होतील.

मकर : मेहनतीचे फळ मिळेल. आरोग्याची काळजी घ्याल.

कुंभ : नवीन कल्पना सुचतील. प्रवास लाभदायक ठरेल.


मीन : भावनांवर नियंत्रण ठेवाल. मागील वसुली होईल.

शब्दगंध क्र. ७५५४ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) हा प्राणी पाण्याच्या बाहेर जिवंत राहू शकत नाही ३) शंभराचा समूह; सेंच्युरी ६) पूर्णपणे होणारा बदल ८) घट्ट; गच्च; खोगीर आवळण्याची वादी ९) वडिलांचा भाऊ; चुलता १०) कणखर; तगडा; बळकट १३) लक्ष वेधून घेणारे; विचारणीय १५) अटीची भाषा १७) मोठा; शक्तिमान; जास्त १९) विधी; नियम; लॉ २०) भारताच्या उत्तर दिशेला असलेला मोठा पर्वत २२) आकांक्षा; मनीषा; इच्छा २४) शरीर; देह; काया २५) मुख्य प्रधान; बुद्धिबळातले एक मोहरे

शब्दगंध क्र. ७५५३ चे उत्तर



उभे शब्द :- १) प्रमाण; मेजरमेंट; गणित २) सोंगटी; मैना ३) अट; पण ४) स्त्रियांचा एक दागिना ५) एकेक बाब घेऊन ७) वकिलाचा व्यवसाय; वकिली ८) कापडाचे खांब देऊन केलेले घर ११) जयघोष १२) संच; सरंजाम; वेष; अलंकार १४) नष्ट होणारे; नाश पावणारे १६) मुस्लिमाचे एक नाव १८) कडक कवच असलेले एक फळ २०) कल्याण; फायदा; हितकर; उपयुक्त २१) एक धान्य; जव; सातू २३) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय; घ्राणेंद्रिय

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : आयुष्यात कितीही मोठे व्हा, पण ज्यांनी तुम्हाला मोठं केलं त्यांना कधीच विसरू नका.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

साबणाच्या बुडबुड्याला रंग कसे येतात?

साबणाच्या बुडबुड्याला पाहिल्यावर प्रत्येकाच्या मनात एक प्रश्न येतो की पारदर्शक पाणी आणि साबण यापासून बनलेला हा बुडबुडा इंद्रधनुष्यासारखा सात रंगात कसा काय चमकतो, याचे उत्तर निसर्गाच्या एका अतिशय रंजक आणि सुंदर भौतिकशास्त्रात लपलेले आहे. खरं तर साबणाच्या बुडबुड्याला स्वतःचा असा एकही रंग नसतो, तो पूर्णपणे पारदर्शक असतो परंतु आपल्याला जे रंग दिसतात ते प्रकाशाच्या खेळामुळे तयार होतात. आपल्याला दिसणारा सूर्याचा किंवा घरातील बल्बचा पांढरा प्रकाश हा वरून साधा दिसत असला तरी तो प्रत्यक्षात तांबडा, नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा आणि जांभळा या सात रंगांच्या प्रकाश लहरींचे मिश्रण असते.

जेव्हा हा पांढरा प्रकाश साबणाच्या बुडबुड्यावर पडतो तेव्हा त्या बुडबुड्याची रचना लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते, बुडबुड्याची भिंत ही पाण्याचा एक अत्यंत पातळ पडदा असते आणि या पडद्याच्या दोन्ही बाजूंना साबणाच्या रेणूंचा थर असतो जो पाण्याला ताणून धरतो आणि बुडबुड्याला गोल आकार देतो. जेव्हा प्रकाश या पातळ पडद्यावर येतो तेव्हा त्याचा काही भाग पडद्याच्या वरच्या पृष्ठभागावरून थेट परत फिरतो आणि काही भाग पडद्याच्या आत शिरून खालच्या पृष्ठभागावरून परावर्तित होऊन बाहेर येतो, अशा प्रकारे एकाच प्रकाशाचे दोन भाग तयार होतात आणि ते एकमेकांना येऊन मिळतात.

या दोन प्रकाश लहरी जेव्हा एकमेकांना मिळतात तेव्हा त्यांच्यात व्यतिकरण नावाची क्रिया घडते, म्हणजे काही ठिकाणी दोन लहरींचे शिखर एकमेकांवर येऊन तो विशिष्ट रंग अधिकच तेजस्वी होतो तर काही ठिकाणी एका लहरीचे शिखर आणि दुसऱ्या लहरीचा तळ एकमेकांना रद्द करून तो रंग नाहीसा होतो. बुडबुड्याची गंमत अशी आहे की त्याचा थर सर्व ठिकाणी सारख्या जाडीचा नसतो, गुरुत्वाकर्षणामुळे पाणी खाली ओघळते त्यामुळे बुडबुड्याचा वरचा भाग अत्यंत पातळ होतो आणि खालचा भाग तुलनेने जाड राहतो आणि जाडीच्या या सतत बदलामुळे वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रंगाच्या लहरी बळकट होतात. त्यामुळे आपल्याला बुडबुड्यावर कधी हिरवा, कधी निळा, कधी जांभळा रंग हलताना आणि नाचताना दिसतो. बुडबुडा जसजसा जुना होतो तसतसा त्याचा थर अधिकाधिक पातळ होत जातो आणि शेवटी तो प्रकाशाच्या तरंगलांबीपेक्षाही पातळ झाल्यावर प्रकाशाचे व्यतिकरण होणे बंद होते आणि तो फुटण्यापूर्वी काळसर दिसू लागतो. याच तत्त्वावर पाण्यावर पडलेल्या तेलाच्या थेंबावर आणि सीडीच्या मागच्या बाजूवर देखील इंद्रधनुषी रंग दिसतात.

प्रमाणिकपणाचे फळ

एका मोठ्या शहरात एक प्रसिद्ध मिठाईवाला होता. त्याच्या दुकानात एक तरुण मुलगा नोकरीला होता, त्याचे नाव श्याम. श्याम खूप गरीब होता पण अतिशय प्रामाणिक होता. एकदा दुकानात खूप गर्दी होती. एका श्रीमंत माणसाने एक किलो मिठाई घेतली आणि घाईत श्यामला पाच हजार रुपयांची नोट दिली.

गर्दीमुळे त्या माणसाला वाटले आपण पाचशे रुपयेच दिले आणि तो सुटे पैसे न घेताच निघून गेला. दुकान बंद झाल्यावर हिशोब करताना श्यामला कळले की गल्ल्यात साडेचार हजार रुपये जास्त आहेत. त्याने लगेच मालकाला सांगितले.

मालक मनात म्हणाला, हा मुलगा खोटे बोलत आहे का हे पाहू, म्हणून तो म्हणाला, जास्त आले असतील तर ठेव तुझ्याकडेच, कोणाला कळणार आहे.

पण श्याम म्हणाला,

नाही मालक, हा पैसा माझा नाही. ज्याचा आहे त्याला परत दिला पाहिजे. दुसऱ्या दिवशी सकाळी श्यामने त्या श्रीमंत माणसाला शोधून काढले आणि त्याचे साडेचार हजार रुपये परत केले. तो माणूस खूप मोठा व्यापारी होता. श्यामच्या प्रामाणिकपणावर तो खूप खुश झाला.

त्याने श्यामला विचारले,

तू इतका गरीब असूनही पैसे परत का केलेस? श्याम म्हणाला,

गरीब असलो तरी आईने शिकवले आहे, दुसऱ्याच्या पैशाला हात लावू नये. त्या व्यापाऱ्याने त्या मिठाईवाल्याच्या मालकाला सांगून श्यामला आपल्या मोठ्या कंपनीत चांगल्या पगारावर नोकरी दिली. काही वर्षांत श्याम आपल्या प्रामाणिकपणा मुळेच त्या कंपनीचा मॅनेजर झाला.

तात्पर्य: प्रामाणिकपणा कधीच वाया जात नाही, त्याचे फळ नेहमी गोडच असते.

आत्मशक्ति



तेव्हा अंतर्मंडळाची चर्चा करताना आम्ही लक्षात घेतले पाहिजे की संत महापुरुष, पैगंबर वा आध्यात्मिक पुरुषांनी त्यांनी अभिप्रेत असलेल्या गोष्टी सांगितल्या आहेत. तेवढेच त्यांना आवश्यक वाटले व तेवढेच त्यांना फक्त आपल्या शिष्यांना सांगावेसे वाटले. जर काहीही ह्याबाबत काहीच लिहून ठेवले नाही तर असे वाटू नये की अंतर्मंडळे नाहीतच. काही संतांना वाटले की, आत्मिक मंडळाची माहिती सर्वांसाठी नाही आणि असे समजून त्यांनी ती गुप्त ठेवली. ते ही माहिती आपल्या शिष्यांना ते फक्त तोंडी सांगत. प्राचीन जुन्या आध्यात्मिक संस्था ह्यांचे चांगले उदाहरण आहे. आपल्या शिक्षणाची ही रचना सांगते.

परंतु ह्या अध्यात्म विद्यालयाच्या प्लॅटो आणि सॉक्रेटिस सारख्यांनी मात्र ह्या रचनेची ओळख आपल्या ग्रंथात दिली आहे काही संत उदा. कबीरजी

अध्यात्मिक शक्ती

आणि स्वामी शिवदयाळजी महाराज सारख्यांनी ह्याबाबत विस्तृत माहिती आपल्यासाठी ठेवली आहे. त्यांनीसुद्धा काही रचना आपल्या शिष्यांना सांगितले परंतु सर्वसाधारणासाठी आंतरिक ज्ञानाच्या बाबतीत बऱ्याच काही सांगितले.

हा योगाच्या स्रोतांचा समीक्ष झालेल्या वर्णनावरून आपल्याला एवढे कळते की सर्वात खालचे मठ म्हणजे भौतिक किंवा पिंड मंडळ आहे. त्यानंतर वीर्य मंडळे येतात सर्वात मठ म्हणजे चताकुंड. येथे हिमसामी मंडळे आहे.'मैं पिता के घर में बहुत से रहने के स्थान हैं।' (जुहना १४:२) ध्यान साधनेतून आम्ही देहभावोवर वर येतो व अस्तित्व मंडळाकडे येतो. त्या प्रवासाचे वर्णन खाली दिले आहे.बऱ्याच आम्ही आमचे ध्यान दुसरे गुरु वा शिवनेत्रावर एकाग्र करतो तेव्हा आमची प्रज्ञा आणि शब्द-ध्वनीच्या लहरींना पकडते. आमचा आत्मा ह्या तरंगात सामील होतो आणि शरीर व मन ह्यांचा वर झेप लागतो. जसजसे आम्ही आंतरिक ज्योतिर्नय वाणी ऐकू लागतो, चंद्र मंडळ झीना वर करून सूक्ष्म मंडळाच्या द्वारावर पोहोचतो. सूक्ष्म मंडळाला आपला स्थूल शरीर सोडणे व अधिक हलकेच व सूक्ष्म अशा शरीराने आपला प्रवास करणे.

स्थूल मंडळापेक्षा सूक्ष्म मंडळ घन (दाट) नाही. परंतु तोताय काही बाबतीत सारखे आहे. सूक्ष्म मंडळात गुण अधिक सूक्ष्मतर व उत्तम असतात. येथील ज्योतीर्मय स्थूल मंडळाच्या अधिक प्रखर असते. येथे मधुर शब्दांचे आत्माना ऐकू येतात. हे आत्माचे विशेष प्रकारचे असतात. हृदयाचे मंडळात प्रवास करताना आत्मा सर्व मोहित होतो. परंतू श्रेष्ठ अडकून पडू नये. असा सल्ला येथे करणारी असंख्य आकर्षके व लोभसवडे यंत्र आहेत. असल्या भूमी करणे येथे सहजशक्य होते. (क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

पण जेव्हा त्याच्या क्षमतेचा तुलना करतात तेव्हा दोन प्रकारचे नुकसान होतं, पहिलं म्हणजे तो मुलगा स्वतःच्या क्षमतांचा वापर करत नाही किंवा त्याच्या क्षमता ओलांडूनच वापराचा प्रयत्न करतात. सर्वच महत्त्वाचं म्हणजे, स्वतःची क्षमता ओलांडूनच वापराचा प्रयत्न करतात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, स्वतःच सर्वोत्तम देण्यापेक्षाही इतरांपेक्षा चांगली कामगिरी करणे – हाच संस्कार त्याच्यात रुजवला जातो. म्हणून फक्त असमाधान हाती येते.

सुरेश ओबेरॉय : पण जर आपण इतरांपेक्षा खरचच ठरलो नाही तर आपण आयुष्यात नापास होऊ.

शिवानीदीदी : त्यावेळी आपण स्वतःच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित नाही का करू शकत ? आपण इतरांच्या कामगिरीवरून प्रेरणा घेऊन त्याचा

नाती घट्ट विणू या

उपयोग आपली कामगिरी सुधारण्यासाठी करू शकतो. पण इतरांना मागे टाकण्यासाठीच प्रयत्न केले गेले तर याचा शेवट काय होईल? जर आपण एकाला टाकलं तर पुढे गेल्यावर अजूनही कोणीतरी असेल. आणि मग आपल्याला त्याला मागे टाकावंसं वाटेल. त्यानंतर आणखी कोणीतरी पुढे असेल... आणि हे असं चालूच राहील. अशाने आपण कधीच आनंदी आणि समाधानी होणार नाही. खेळामध्ये किंवा प्रत्यक्ष आयुष्यातील स्पर्धेमध्ये, जिथे आपण जाणीवपूर्वक स्पर्धा करत असतो, तिथे आपल्याला फक्त स्वतःच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करायला सांगितलं जातं. जर आपण इकडेतिकडे बघत बसलो तर काय होईल?

सुरेश ओबेरॉय : एकाग्रता नसल्याने आपला वेग कमी होईल.

शिवानीदीदी : त्याबरोबर भीती आणि काळजी या भावना निर्माण होतील आणि आपली कार्यक्षम ता घटेल. याऐवजी जर आपण आपल्या खेळावर मन एकाग्र केलं तर आपण आपल्या क्षमताप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करू.

सुरेश ओबेरॉय : स्पर्धेमध्ये एका सेकंदासाठी जरी आपलं दुर्लक्ष झालं तरी आपल्यासाठी सगळं संपलेलं असतं. शिवानीदीदी : एक सेकंदाच्या दुर्लक्षामुळे आपण स्पर्धा हरू शकतो तर कल्पना करा की, आयुष्यात आपल्या पुढे कोण जातंय हेच आपण इकडेतिकडे बघत राहिलो तर स्वतःबरोबर काय करू? (क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : पाणी आणि हवा यांत काय फरक आहे?

बंडू : सर, खूप मोठा फरक आहे! पाण्यात आपण पोहू शकतो, पण हवेत आपण उडू शकत नाही... आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, पाण्यात बुडाल्यावर हवा आठवते, पण हवेत असताना पाणी आठवत नाही!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

– १९४५

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरणनमस्कारामध्ये गर्भवती व बाळ या दोघांच्या आरोग्यासाठी खालील तपासण्या करणे महत्त्वाचे असते.

१) हिमोग्लोबिन : हिमोग्लोबिन तपासणीमुळे गर्भवती स्त्रीच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण किती आहे, हे समजते. गर्भवती स्त्रीच्या शरीरात प्रमाण कमी असल्यास त्याचा बाळाच्या शारीरिक व मानसिक वाढीवर परिणाम होतो. कारण रक्ताद्वारे गर्भाला पोषण व ऑक्सिजन मिळते. प्रसूतीच्या वेळेला गर्भवती स्त्रीच्या अंगात रक्ताचे प्रमाण कमी असल्यास तिला जीवावर धोका होऊ शकतो.

अशी वेळ येऊ नये म्हणून गर्भवतीने आहार योजना करावी. गर्भवतीची आयर्नची लेव्हल कमी असेल तर आयर्नची इंजेक्शन, टॅबलेट, सिरप

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

घ्यावेत. नैसर्गिकरित्या आयर्न वाढवण्यासाठी हिरव्या पालेभाज्या, बीट, गूळ, शेंगदाणे, खजूर यांचा समावेश करावा. ही तपासणी दर एक महिन्याला व शेवटच्या महिन्यात दोनदा करावी. टोमॅटोचा, लसूण, तेज, पालक, मेथीचा समावेश करावा. ही तपासणी दर एकदा रक्त तपासणी केली जाते.

२) रक्तगट तपासणी :

प्रसूतीच्या वेळेला रक्तस्रावामध्ये रक्ताचे प्रमाण कमी असल्यास रक्ताची आवश्यकता असते. अशा वेळी रक्त देणे गरजेचे असते. रक्तगट माहित असल्यास रक्त मिळणे सोपे होते. रक्तगटामध्ये आईच्या रक्ताचा गट कोणता आहे, आर.एच. पॉझिटिव्ह असणे व निगेटिव्ह असणे आवश्यक असते. तसेच गर्भातील बाळाचा कॉम्बो टेस्ट होऊन बोध निर्माण होईल. बाळाच्या रक्तगटावरून त्याप्रमाणे योग्य वेळेस योग्य ती उपाययोजना करता येते व त्यामुळे संभाव्य धोके टाळता येतात.

३) एच.आय.व्ही. (एड्स) तपासणी :

एच. आय. व्ही. ची तपासणी आधुनिक काळात फार महत्त्वाची झाली आहे. त्यामुळे गर्भवती व तिच्या होणाऱ्या बाळाला याची लागण आहे की नाही हे समजते. जर मातेला एच.आय.व्ही. ची लागण असेल, तर बाळाला ती लागण होऊ नये, म्हणून डॉक्टर काही प्रतिबंधात्मक उपचार पद्धती सुरू करतात. **(क्रमशः)**

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेला मिळाले नवे पदाधिकारी



नगर – अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. सुजय विखे व उपाध्यक्षपदी रणजितसिंह देशमुख यांची बिनविरोध निवड झाल्याने बँकेला नवे कारभारी मिळाले आहेत. सन १९६९-७० मध्ये पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे हे अध्यक्ष तर भाऊसाहेब थोरात हे उपाध्यक्ष झाले होते. यानिमित्ताने या निवडीने इतिहासाची पुनावृत्ती झाली आहे. दोघांनीही विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, बाळासाहेब थोरात आदींच्या उपस्थितीत पदभार स्विकारला. प्रा. शिंदे यांच्या दोन्ही संचालकांनी विखे यांना पाठिंबा दिला.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा बँकेच्या मुख्य कार्यालयात १२ नोव्हेंबर रोजी नव्या अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीसाठी सभा झाली. यावेळी बँकेच्या प्रशासक संगिता डोंगरे, मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे उपस्थित होते.

चार आमदार, एक खासदारासह अनेक दिग्गज संचालक

आ. मोनिका राजळे, आ. आशुतोष काळे, आ. प्राजक्त तनपुरे, आ. अक्षय कर्डिले हे चार आमदार, नीलेश लंके हे खासदार, डॉ. सुजय विखे हे माजी खासदार व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे चिरंजीव, रणजिसिंह देशमुख हे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई, शंकरराव गडाख हे माजी मंत्री, वैभव पिचड हे स्वतः माजी आमदार व माजी मंत्री कै. मधुकरराव पिचड यांचे चिरंजीव, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा व बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले यांच्या पत्नी राजश्री घुले, बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष रामनाथ वाघ यांच्या सुनबाई संगिता वाघ, आ. विवेक कोल्हे यांचे वडील बिपीन कोल्हे, आ. संग्राम जगताप यांचे बंधू सचिन जगताप, माजी आमदार कै. शिवाजी नागवडे यांच्या सुनबाई अनुराधा नागवडे, माजी आमदार कै. जयंत ससाणे यांचे चिरंजीव करण ससाणे हे १६ जण दिग्गज व बड्या घरातील संचालक असून उर्वरीत दत्ता पानसरे, गणपतराव सांगळे, ज्योती शिंदे, सचिन घुमरे, कारभारी जावळे हे पाच जणही बड्या नेत्यांचे समर्थक असून यातील काहींनी मोठ मोठी पदे भुषविलेली आहेत.

दहा साखर कारखानदार संचालक बोर्डात

जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे (पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर), उपाध्यक्ष रणजितसिंह देशमुख (सहकारमहर्षी डॉ. भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, संगमनेर), संचालक वैभव पिचड (अगस्ती सहकारी साखर कारखाना, अकोले), आ. आशुतोष काळे (कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना, कोपरगाव), बिपीन कोल्हे (सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना, कोपरगाव), आ. प्राजक्त तनपुरे (डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे सहकारी साखर कारखाना, राहुरी), राजश्री घुले (लोकनेते मारूतराव घुले सहकारी साखर कारखाना, शेवगाव), आ. मोनिका राजळे (श्री वृध्देश्वर सहकारी साखर कारखाना, पाथर्डी), शंकरराव गडाख (मुळा सहकारी साखर कारखाना, नेवासे), अनुराधा नागवडे (सहकारमहर्षी शिवाजीबापू नागवडे सहकारी साखर कारखाना, श्रीगोंदे). हे दहा साखर कारखानदार बँकेवर संचालक म्हणून नियुक्त झाले आहेत.

पहिल्यांदाच संचालक अन थेट पदाधिकारी

जिल्हा बँकेच्या संचालक मंडळात पहिल्यांदाच प्रवेश करताच डॉ. सुजय विखे आणि रणजितसिंह देशमुख यांना अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली आहे. दुसरीकडे, मागील संचालक मंडळातील माजी मंत्री शंकरराव गडाख, आ. आशुतोष काळे, आ. मोनिका राजळे, गणपतराव सांगळे आणि अनुराधा नागवडे यांना पुन्हा एकदा संचालक म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. तर बिपीन कोल्हे व दत्तात्रय पानसरे यांनी याआधीही बँकेत संचालक म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे नव्या संचालक मंडळात अनुभवी आणि नव्या चेहऱ्यांचा संगम पाहायला मिळत आहे

माझी चौकीदाराची भूमिका कायम राहणार : खा. लंके

खा. नीलेश लंके हे पदाधिकारी निवडीच्या वेळी बँकेत येऊन प्रोसेडींग बुकवर सही करून लगेच निघून गेले. पण त्यांनी जाता जाता आपण बँकेत चौकीदाराची भुमिका पार पाडणार असून रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसारच कर्जवाटप झाले पाहिजे अशी भुमिका मांडली. लंके यांनी विखे समर्थक राहुल शिंदे यांचा पारनेर सेवा सोसायटी मतदारसंघातून मोठ्या मताधिक्क्याने पराभव करत बँकेत प्रवेश मिळविला. त्यावेळी त्यांनी विजयी सभेत दंड थोपटत विखे यांना आव्हान दिले होते. अध्यक्ष निवडीनंतर विखे यांनीही लंके यांच्या त्या स्टाइलची पुनावृत्ती केल्याने बँकेत विखे-लंके संघर्ष बघायला मिळणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

मिले सुर मेरा तुम्हारा : विखे- शिंदे एकत्र

निवडणुकीच्या आधी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे व विखे-थोरात गटात समन्वय नसल्याचे दिसून आले पण त्यांच्या गटाचा एक संचालक बिनविरोध झाला, तर एक निवडून आला. निवडीनंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी चौंडी येथे शिंदे यांच्या निवासस्थानी जात मनोमिलन घडवून आणल्याने शिंदे यांचे दोन्ही संचालक विखे-थोरात गटाबरोबर आले आहेत. त्यामुळे हे संख्याबळ २० इतके झाले असून आता केवळ खा. नीलेश लंके हे एकमेव संचालक विरोधात भूमिका बजावताना दिसतील. त्यांना छुपी साथ कुणाची मिळते हे पाहणेही आत्सुक्याचे आहे.

प्रेरणादायी अक्षरधन

अज्ञान व अहंकार यांची साथ घातक





उष्टाणां गृहे लग्न ।
गर्दभास्तत्र गायकाः ।।
परस्परं स्तुवन्त्येते । अहो
रुपमहोध्वनिः ।।

बेढव शरीराच्या, उंचमान्या उंटाच्या घरी होते लग्न. तेथे वऱ्हाड्यांच्या मनोरंजनासाठी गायला बसले गाढव. गाढव म्हणाले उंटाला, काय हो तुमचं रूप देखणं! उंट म्हणाला गाढवाला, केवढा हो तुमचा आवाज गोड!

मूर्खाला मूर्खाचीच जोड. शहाणा थोडाच करणार आहे. मूर्खाची प्रशंसा. सर्वांगी वेडावाकडा असा उंट, रूपानं फाकडा. हे म्हणेल फक्त एखादाच गधडा। मग उंटावरही आपोआप आलेच, गाढवाच्या ओरडण्याला गोड गाणे म्हणणे. दुर्गुण्यांना एकमेकांना साथ द्यावीच लागते. पण म्हणून दुर्गुणांचे का सदगुणांत रूपांतर होते? उलट दोन दुर्गुणी एकत्र आल्याने समाजाचा अधिकच छळ होतो.

संतांनी हा उंट आणि गाढव यांचा दृष्टांत वापरून दुर्गुणी असे अज्ञान व छळवादी असा अहंकार यांची दोस्ती माणसाला जबरदस्तीने नाशाकडे नेते आणि भयंकर दुःखी करते, असे म्हटले आहे. संत दयाळनाथ म्हणतात,

जैसे उंट आणि खर, तैसे अज्ञानाहंकार।
एकमेकां देती हात, करिती घात आयुष्याचा।।

एक होता देवदत्त, रात्री निघाला परगावी जायला. रस्त्यात लागला ओढा. तो होता भरलेला. देवदत्ताला दिसला एकदम एक माणूस उभा त्या पाण्यात. डोके बारीक पण हातपाय जाड आणि खूप लांब. पाय तरी केवढे जाड, हात पसरलेले जणू पकडायला आणि आवळायला, जो येईल समोर यायला. देवदत्त घाबरला. घेरी येऊन चिखलात पडला. रात्रभर पावसात भिजला. लोक निघाले शोधायला केला त्यांनी सावध देवदत्ताला काय झाले रे?

देवदत्ताने ओढ्यात पाहिले. एक तुटके झाड फांद्यासकट होते चिखलात रुतलेले. पण झाडाचे ज्ञान न होता त्याला माणसाचीच जाण झाली. त्या अज्ञानापायी चिखलात रात्रभर पडणे नशिबी आले. म्हणूनच अज्ञानाची व्याख्या केली आहे. ज्ञानविरोधी यत्किंचित जे काही असते ज्ञानाच्या विरुद्ध ते अज्ञान.

अहंकारसुद्धा असाच वाईट. मीर हसन नावाचा शायर म्हणतो,

आसान तुम न समझो निरव्वत से पाक होना।
इक उम्र खो के हसने सीखा है खाक होना ।।

निरव्वत म्हणजे अहंकार. अहंकारातून मुक्त होणे सोपे नका समजू. आयुष्य गेले, पण अहंकारातून सुटणे नाही जमले. शेवटी खाक होणेच नशिबी आले.

ज्ञानेश्वर माउली म्हणते, अहंकार आणि अज्ञानी देह यांचे एकमेकांवर प्रेम जडले. मग त्यांना इच्छा ही मुलगी झाली. ती कायरूपी तारुण्यात आली. मग तिचे द्वेषाशी लग्न झाले. त्या दोघांपासून द्वंद्व मोह जन्मला. त्याचा आजा जो अहंकार, त्याने त्याला वाढवले. अज्ञानाने मांडीवर खेळवले. तेव्हा प्राणिमात्र भांबावले. संसाररूपी अरण्यात पडले. मग मोठमोठाल्या बडवले गेले.

तेणे भुते भांबावली। म्हणौनी संसाराचिया
आडवामाजी पडिली ।
मग महादुःखाच्या घेतली। दांडेवरी।।

अज्ञान अंगी असलेला माणूस एखाद्या रांगत्या मुलासारखा असतो. चांगले वाईट यातला विवेक नसतो. जे दिसेल ते ती तोंडात टाकतो.

हे चोख हे मैल। ऐसे नेणोनिया बाळं ।
देखे ते केवळ। मुखीचि घाली ।

– किशोर गांधी

डॉ.सुजय विखेंसह संबंधितांना न्यायालयाची कारणे दाखवा नोटीस

जिल्हा बँकेच्या बिनविरोध निवडीला आव्हान

नगर- जिल्हा बँकेच्या संचालकपदासाठी डॉ. सुजय विखे यांना बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करण्यात आले आहे. मात्र, त्यांच्या या निवडीला सहकार न्यायालयात आव्हान देण्यात आले असून, याप्रकरणी न्यायालयाने डॉ. सुजय विखे यांच्यासह जिल्हा बँक, निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नाशिक आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. याचिकाकर्त्याने केलेल्या मागण्या मान्य का करू नयेत, याबाबत १६ नोव्हेंबर रोजी म्हणणे सादर करण्याचे आदेश न्यायाधीश श्वेता व्ही. मोरे-पाटील यांनी दिले आहेत, अशी माहिती ॲड. सुरेश लगड यांनी दिली.

एकनाथ चंद्रभान घोगरे यांच्या वतीने ॲड. लगड यांनी सहकार न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केली आहे. डॉ. विखे यांनी राहाता सेवा सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तर याच मतदारसंघातून एकनाथ घोगरे यांनीही अर्ज दाखल केला होता. याचिकेतील माहितीनुसार, सुजय विखे हे सन २०१६ ते २०२३ या कालावधीत तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर तज्ज्ञ संचालक म्हणून कार्यरत होते. या कारखान्याने जिल्हा बँकेकडून कर्ज घेतले होते. संबंधित कर्ज थकीत झाल्यानंतर कारखान्याच्या संचालक मंडळाने वैयक्तिक हमीच्या आधारे पुन्हा कर्जाची मागणी केली होती. हे कर्ज मंजूर झाल्यानंतर तेही थकीत राहिल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर, सहकार कायद्यातील तरतुदीनुसार सुजय विखे हे थकबाकीदार ठरत असल्याने त्यांचा जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील नामनिर्देशन अर्ज नामंजूर करावा, अशी हरकत एकनाथ घोगरे यांनी घेतली होती. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ही हरकत फेटाळून लावल्याने घोगरे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने २२ ऑक्टोबर रोजी ही याचिका निकाली काढताना याचिकाकर्त्याला सहकार न्यायालयात दाद मागणे योग्य ठरेल, असे नमूद केले होते. त्यानंतर घोगरे यांनी सहकार न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केली आहे.

याचिकेतील मागण्यांच्या अनुषंगाने सहकार न्यायालयाने सुजय विखे यांच्यासह संबंधित संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. याचिकाकर्त्याच्या मागण्या मान्य का करू नयेत, याबाबत १६ नोव्हेंबर रोजी आपले म्हणणे सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

चीनमधील बुद्धिबळ खेळणारा अत्याधुनिक रोबोट प्रथमच अहिल्यानगरमध्ये

शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ; देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग



नगर – अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ सोहम फिरोदिया आणि अनुष्का फिरोदिया यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू आणि पालक उपस्थित होते. अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे चीनमधून आणण्यात आलेला अत्याधुनिक बुद्धिबळ खेळणारा रोबोट! हा रोबोट प्रत्यक्ष खेळाडूंशी बुद्धिबळाचा डाव खेळत असून, अहिल्यानगरमध्ये प्रथमच बुद्धिबळप्रेमींना रोबोटसोबत खेळण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे.

स्पर्धेच्या प्रारंभी संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रास्ताविक केले.

जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, अहिल्यानगरमधून बुद्धिबळ खेळाचा प्रचार आणि प्रसार सातत्याने होत आहे. दरवर्षी संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धांना मोठ्या संख्येने खेळाडू सहभागी होतात. बुद्धिबळ खेळाडूं साठी शंभरहून अधिक बुद्धिबळ इंटरनॅशनल वुडन बोर्ड उपलब्ध करून देण्या बरोबरच आता चीनमधील अत्याधुनिक रोबोट आणण्यात आला आहे. रोबोट सोबत खेळण्या मुळे खेळाडूंचा खेळ अधिक दर्जेदार होण्यास मदत होईल. भारतामध्ये शंभरहून अधिक ग्रँडमास्टर झाले असून, अहिल्यानगर मधून ही अजुन एक ग्रँडमास्टर तयार करण्यासाठी संघटना कटिबद्ध आहे. बुद्धिबळ हा असा खेळ आहे की, तो एकट्या व्यक्तीलाही मोबाईल वर खेळता येतो. त्यामुळे बुद्धिबळाचा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार व्हावा, हा आमचा मानस आहे. आधुनिक युगा नुसार बुद्धिबळासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या स्पर्धेत देशभरातून २५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. दिव-दमण, गुजरात, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल आदी राज्यांमधून खेळाडू सहभागी झाले आहेत. तसेच महाराष्ट्रातील यवतमाळ, वर्धा, ठाणे, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, पुणे, सांगली, रत्नागिरी, रायगड, छत्रपती संभाजीनगर, पालघर, नाशिक, नांदेड, नागपूर, मुंबई, जालना, जळगाव, हिंगोली, धुळे, धाराशिव, चंद्रपूर, बुलढाणा, बीड आणि अकोला येथील खेळाडूंनीही सहभाग घेतला आहे.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे खेळाडूंच्या वयोगटातील विविधता. अवघ्या साडेचार वर्षांच्या बाल खेळाडू पासून ते ८७ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटांतील बुद्धिबळपटू आपले कौशल्य पणाला लावत आहेत. चीनमधून आलेला बुद्धिबळ खेळणारा यंत्रमानव खेळाडूंशी प्रत्यक्ष डाव खेळणार असल्याने नगरमधील तसेच बाहेरगावच्या खेळाडूंना त्याच्यासोबत बुद्धिबळ खेळण्याची संधी मिळणार आहे. बुद्धिबळ खेळाडू, पालक आणि प्रशिक्षकां साठी हा अनुभव विशेष ठरणार असल्याची माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

या वेळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, शाम कांबळे, पारुनाथ ढोकळे, संजय खडके, प्रकाश गुजराथी, स्वप्निल भगुरकर विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, संजय जोशी, मनीष जसवानी, चेतन कड, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, शार्दुल तापसे, शिशिर इंदुरकर, विजय चोरडिया, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, रोहिणी आडकर आदींसह खेळाडू आणि पालक उपस्थित होते.

'ते' आले प्रोसिडिंग बुकवर सही केली अन् मानधनाचे पाकीट नाकारत निघूनही गेले

जिल्हा बँकेत संचालकपदी विजयानंतर खा.नीलेश लंकेंची पहिली एन्ट्री लक्षवेधी



नगर – जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १२ नोव्हेंबर रोजी खा. नीलेश लंके यांची जिल्हा बँकेतील पहिलीच एन्ट्री लक्षवेधी ठरली. पारनेर सोसायटी मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून खा. लंके दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास संचालक मंडळाच्या बैठकीसाठी उपस्थित राहिले. त्यांनी बैठकीच्या प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी केली आणि त्यानंतर तेथून निघून गेले. विशेष म्हणजे, स्वाक्षरीनंतर संबंधित अधिकाऱ्याने त्यांना संचालक म्हणून देय असलेले मानधनाचे पाकीट देऊ केले. मात्र, खा. लंके यांनी दोन्ही हात जोडून नम्रपणे मानधन स्वीकारण्यास नकार दिला.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पारनेर सोसायटी मतदारसंघातील लढत संपूर्ण जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधणारी ठरली होती. या अटीतटीच्या लढतीत खा. नीलेश लंके यांनी डॉ. सुजय विखे यांचे समर्थक राहुल शिंदे पाटील यांचा २४ मतांनी पराभव केला. खा. लंके यांना ६४ मते मिळाली, तर शिंदे पाटील यांना ४० मतांवर समाधान मानावे लागले.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रक्रियेत डॉ. विखे यांनी जिल्ह्यातील विविध पक्षांच्या नेत्यांना एका व्यासपीठावर आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या प्रक्रियेत खा. लंके यांना बाजूला ठेवण्यात आल्याची राजकीय चर्चा होती. मात्र, या सर्व घडामोडींनंतरही लंके यांनी पारनेर मतदारसंघातील लढतीत आपले राजकीय कसब पणाला लावत विजय मिळविला.

या पार्श्वभूमीवर १२ नोव्हेंबर रोजी जिल्हा सहकारी बँकेच्या बैठकीसाठी खासदार लंके यांनी लावलेली उपस्थिती महत्त्वाची मानली जात आहे. बैठकीत केवळ प्रोसिडिंग बुकवर स्वाक्षरी करून बाहेर पडणे आणि त्यानंतर मानधनाचे पाकीटही स्वीकारण्यास नकार देणे, या दोन्ही बाबींमुळे त्यांची जिल्हा बँकेतील पहिलीच उपस्थिती चर्चेचा विषय ठरली. निवडणुकीत विजय मिळविल्यानंतर जिल्हा बँकेच्या राजकारणात लंके यांची पुढील भूमिका काय असणार, याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे.

समाज कल्याण निरीक्षकाला ७५ हजारांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माध्यमातून केडगाव येथे संत रोहिदास विकास केंद्र उभारण्याचे काम पूर्ण करणाऱ्या शासकीय ठेकेदाराकडे उर्वरित प्रलंबित निधीचा प्रस्ताव मंत्रालयात पाठवण्यासाठी आणि तो मंजूर करून घेण्यासाठी तब्बल ७५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या समाज कल्याण निरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ जेरबंद केले आहे. सहायक आयुक्तांच्या कार्यालयातच १२ नोव्हेंबर रोजी ही सापळा कारवाई करण्यात आली आहे. संदीप हरिभाऊ फुंदे असे या लाचखोर समाज कल्याण निरीक्षकाचे नाव आहे,

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे शासकीय ठेकेदार म्हणून काम करत असून त्यांनी महापालिकेच्या हद्दीतील केडगाव येथील सर्व्हे नंबर ४९/२ आणि ५०/१ मधील महानगरपालिकेच्या जागेत संत रोहिदास विकास केंद्र उभारण्याचे काम पूर्ण केले होते. या कामापोटी त्यांना यापूर्वी २५ लाख रुपये मिळाले असून, उर्वरित २४ लाख ८० हजार ९८४ रुपयांच्या निधीच्या मागणीसाठी मनपाकडून समाज कल्याण विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता.

हा प्रलंबित दायित्व निधी मंजूर करून घेण्यासाठी व मंत्रालयातून प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी समाज कल्याण कार्यालयातील निरीक्षक संदीप हरिभाऊ फुंदे याने ५ नोव्हेंबर रोजी तक्रारदाराला फोन करून कार्यालयात बोलावून घेतले. मंत्रालयातून निधी मागवण्यासाठी आणि पुढील प्रक्रिया करून घेण्यासाठी ७५ हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी त्याने केली होती.याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली होती. त्यानंतर १२ नोव्हेंबर रोजी समाजकल्याण कार्यालयात लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. या पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक संदीप हरिभाऊ फुंदे (समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण कार्यालय, अहिल्यानगर) याने पंचांसमक्ष ७५ हजार रुपयांची लाच मागितली आणि ती स्वीकारण्याची तयारी दर्शवली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्याच दिवशी सापळा रचून आरोपी संदीप फुंदे याला तक्रारदाराकडून ७५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. आरोपीला दुपारी ४:२२ वाजता ताब्यात घेण्यात आले असून, याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची आला आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहिल्यानगरचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे, पोलीस हवालदार संतोष शिंदे, पो. कॉ. रवि निमसे, कराड आणि चालक पोलीस हवालदार हारूण शेख यांच्या पथकाने केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, भ्रष्टाचारासंबंधित किंवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाविषयी कोणतीही माहिती असल्यास त्यांनी एसीबीच्या अहिल्यानगर कार्यालयाशी संपर्क साधावा.

नगरच्या आनंदतीर्थ समवशरण येथे १४ नोव्हेंबरला कुंदनऋषीजी महाराजांचा ९३ वा जन्मोत्सव कार्यक्रम

सौरभ बोरा यांना 'समाज रत्न' तर अशोक (बाबूशेठ) बोरा यांना 'समाज गौरव' सन्मान



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन कर्मभूमी आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे समर्पण चातुर्मास उत्साहात पार पडत आहे. यात १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता आचार्यश्रीजींचे ज्येष्ठ शिष्य महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. यांचा ९३ वा जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., साध्वीजी त्रिशलाकंवरजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. यांच्या पावन सानिध्यात हा कार्यक्रम होणार आहे.

यावेळी अमितज्योतीजी म.सा. यांच्या शिष्या अपूर्वज्योतीजी म.सा. यांचा १०८ आयंबिल तपोत्सवही होणार आहे. तसेच प्रवर्तकश्रीजींच्या घोषणेनुसार उद्योगपती सौरभ हेमराज बोरा यांचा 'समाज रत्न' म्हणून सन्मान करण्यात येणार आहे. याशिवाय समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांचा 'समाज गौरव' म्हणून सन्मान करण्यात येणार आहे.

सौरभ बोरा यांनी परिवाराचा धार्मिक व अध्यात्मिक वारसा पुढे चालवला आहे. व्यवसायात यशोशिखरावर असताना ते धर्म कार्यात कायम योगदान देत असतात. त्यांची आचार्यश्रींवर नितांत श्रद्धा आहे. नगरला उपाध्यायश्रींचा चातुर्मास निश्चित होताच त्यांनी संपूर्ण चातुर्मासचे मुख्य लाभार्थी म्हणून आवश्यक सहकार्य करण्याची जबाबदारी स्वीकारली. या धर्म कार्याचा गौरव म्हणून त्यांचा समाज रत्न म्हणून सन्मान होत आहे.

अशोक (बाबूशेठ) बोरा हे अतिशय धार्मिक व सदैव साधू संतांच्या सेवेत रममाण होणारे आहेत. समाजाला संघटित करून सर्वांना सोबत घेत धर्माचरण वाढविण्यासाठी ते सातत्याने योगदान देतात. आपल्या सर्व ट्रस्टी सहकाऱ्यांसह त्यांनी समर्पण चातुर्मासाचे आखीवरेखीव असे भव्य दिव्य नियोजन केले आहे. या कार्याबद्दल त्यांचा समाज गौरव सन्मान केला जात आहे.

या कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण चातुर्मास समितीच्या सर्व ट्रस्टी मंडळाने, सकल जैन समाज तसेच संपूर्ण चातुर्मास काळात गौतम प्रसादीची व्यवस्था सांभाळणारे मित्र परिवार व त्यांचे सहकाऱ्यांनी केले आहे.

महापालिका कर्मचाऱ्यांचे २३ नोव्हेंबरपासून बेमुदत धरणे आंदोलन

सण अग्रीमसह १३० कोटींपेक्षा अधिक थकीत देणी देण्याची कामगार युनियनची मागणी; आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन

नगर – महाराष्ट्रातील विविध शासकीय कार्यालयांमधील तसेच महानगरपालिकांमधील कर्मचाऱ्यांना दिवाळी सणापूर्वी सण अग्रीम दिले जाते. मात्र, अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाकडून यंदा कर्मचाऱ्यांना अद्याप सण अग्रीमची रक्कम देण्यात आलेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सण अग्रीमसह कर्मचाऱ्यांच्या विविध थकीत देणी मिळावीत, या मागणीसाठी महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने २३ नोव्हेंबरपासून आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, दिवाळी सणानिमित्त कर्मचाऱ्यांना सण अग्रीम मिळावे, यासाठी संदर्भीय पत्र तसेच शासन निर्णयांच्या आधारे यापूर्वीच प्रशासनाकडे मागणी करण्यात आली होती. याबाबत प्रशासनाशी चर्चाही झाली होती. मात्र, दिवाळी सण संपूनही अद्याप सण अग्रीमची रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

सण अग्रीमबाबत वेळोवेळी संपर्क साधला असता आयुक्त व महानगरपालिकेतील इतर अधिकारी वसुलीचे कारण पुढे करून पैसे उपलब्ध नसल्याचे सांगतात. त्यामुळे सण अग्रीमची रक्कम देणे शक्य नसल्याचे प्रशासनाकडून कळविण्यात येत असल्याचे युनियनने निवेदनात नमूद केले.

मागील वर्षी म्हणजेच १ एप्रिल २०२५ ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत झालेली वसुली आणि चालू वर्षी १ एप्रिल ते १२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत झालेली वसुली पाहता दोन्ही वर्षांतील वसुली जवळपास सारखीच आहे. असे असतानाही मागील वर्षी प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सण अग्रीम, कालबद्ध पदोन्नती तसेच इतर देणी अदा केली होती. यंदा मात्र निवडणूक कार्यक्रम, जनगणना कार्यक्रम, एस.आय.आर. यांसारखी अतिरिक्त कामे करूनही वसुली कर्मचाऱ्यांनी मागील वर्षाच्या तुलनेत चांगली वसुली केली आहे. असे असतानाही जाणीवपूर्वक सण अग्रीम अदा न करून कामगार–कर्मचाऱ्यांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप युनियनने केला आहे.

महानगरपालिका कर्मचाऱ्यांची अनेक वर्षांपासून विविध आर्थिक देणी प्रलंबित असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामध्ये कोर्ट कर्मचारी व हद्दवाढीतील कर्मचाऱ्यांचा पाचव्या वेतन आयोगाचा फरक, सेवानिवृत्त व कायम कर्मचाऱ्यांचा सहाव्या वेतन आयोगाचा फरक, कालबद्ध पदोन्नतीस पात्र असलेल्या कामगार–कर्मचाऱ्यांचा फरक, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान, शिल्लक रजेचा पगार आणि भविष्य निर्वाह निधीच्या रकमा वेळेवर अदा केल्या जात नसल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत.

तसेच भविष्य निर्वाह निधीची कपात करूनही संबंधित रक्कम कर्मचाऱ्यांना वेळेवर मिळत नाही. सोसायटीची कपात केलेली रक्कम वेळेवर जमा केली जात नाही. मागील दीड वर्षापासून वैद्यकीय परिपूर्तीची बिले अदा करण्यात आलेली नाहीत. एल.आय.सी.चे हप्ते वेतनातून कपात करूनही ते वेळेवर एल.आय.सी.कडे वर्ग केले जात नाहीत. याशिवाय सर्व कायम कामगार–कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगाची रक्कमही अद्याप अदा करण्यात आलेली नसल्याचे युनियनने म्हटले आहे.

महापालिका कर्मचाऱ्यांच्या या सर्व थकीत रकमा सुमारे १३० कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची देणी प्रलंबित असताना केवळ वसुलीचे कारण पुढे करून सण अग्रीम नाकारणे ही कामगार–कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी कृती असल्याचे युनियनने म्हटले आहे.

महापालिका प्रशासनाच्या अडचणी समजून घेऊन युनियनने वेळोवेळी चर्चा करून सहकार्याची भूमिका घेतली आहे. मात्र, सण अग्रीम आणि कर्मचाऱ्यांची सर्व थकीत देणी देण्याबाबत ठोस कार्यवाही होत नसल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार २३ नोव्हेंबरपासून महापालिका कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी महापालिका प्रशासनावर राहील, असा इशारा युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सचिव आनंद वायकर यांनी दिला आहे.

जमिनीवर ताबा मारण्याचा प्रयत्न; महिलांसह १६ जण पोलिसांच्या ताब्यात

डायल ११२ च्या मदतीने प्रयत्न उधळला; सावेडी उपनगरातील घटना

नगर – शहरातील सावेडी परिसरातील डॉन बॉस्को शाळा शेजारील एका जागेवर २० ते २५ महिलांना एकत्र आणून तोडफोड करत बेकायदेशीररीत्या ताबा मारणाऱ्या एका मुख्य सूत्रधारासह १५ महिलांना तोफखाना पोलिसांनी डायल ११२ च्या तात्काळ मदतीने ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ नोव्हेंबर रोजी तोफखाना पोलीस स्टेशनच्या 'डायल ११२' वर बहिरूनाथ मच्छिंद्र भोर यांचा कॉल प्राप्त झाला. तक्रारदाराने हिरा पॅलेसच्या पाठीमागे, डॉन बॉस्को शाळा शेजारी २० ते २५ महिला येऊन तोडफोड करत असून मदतीची गरज असल्याचे कळवले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप एकशिंगे यांनी पोलीस पथकासह तत्काळ घटनास्थळ गाठले.

पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तक्रारदाराच्या घराशेजारील जागेत तोडफोड करून बेकायदेशीर ताबा घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या महिलांकडे जागेच्या मालकी हक्काबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे कोणतेही वैध दस्तावेज आढळून आले नाही. कसून चौकशी केली असता, हा प्रकार अमोल दिलीप निक्रड (रा. साईविहार कॉलनी, गणेश चौक, बोल्हेगाव फाटा, अहिल्यानगर) याच्या सांगण्यावरून केल्याची कबुली त्यांनी दिली.

घटनेतील फिर्यादी बहिरूनाथ मच्छिंद्र भोर यांच्या फिर्यादीवरून मुख्य आरोपी अमोल दिलीप निक्रड, १५ महिला आणि ४ ते ५ अनोळखी महिलांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३२९(३), ३२४(२), ३५२, ३५१(२), १८९(२), १९०, १९१(२), २२१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मुख्य सूत्रधार अमोल निक्रड आणि १५ महिलांना तात्काळ ताब्यात घेतले असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर करत आहेत.

या कारवाईदरम्यान स.पो.नि. प्रदीप एकशिंगे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणीही महिलांना पुढे करून बेकायदेशीर ताबा घेण्याचा प्रयत्न करत असल्यास नागरिकांनी न घाबरता तात्काळ तोफखाना पोलिसांशी संपर्क साधावा तसेच जमिनीच्या वादाबाबत कुठल्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करू नये.

सदर कारवाई स.पो.नि. प्रदीप एकशिंगे, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिरसाठ, राहुल म्हस्के, सुमित गवळी, शफी शेख, शाकीर सय्यद, मपोहेकॉ जिजा खुडे, अहिल्या गलांडे, ललिता कोळसे तसेच होमगार्ड श्रावण वराळे, ऋतीक फरतडे, तुषार सुद्रक, किरण उबाळे, गोकुळ टेमकिरे यांच्या पथकाने केली आहे.

कायनेटिक चौकात एसटी बस चालकासह वाहकाला तरुणांनी केली बेदम मारहाण

नगर – शहरातील कायनेटिक चौक परिसरात रस्ता ओलांडत असलेल्या एका पादचाऱ्याला बस समोर आल्याने हटकल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून दोन तरुणांनी एसटी बस चालकासह वाहकाला लाथाबुक्क्यांनी आणि दगडाने मारहाण केल्याची घटना १० नोव्हेंबर रोजी रात्री १२.४५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, एसटी चालकाच्या डोक्यात दगड मारल्याने गंभीर दुखापत झाली आहे.

मुंबई सेंट्रल डेपोचे एसटी चालक गणेश मारुती वाघचौरे (वय ३८, रा. वैरागड, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १० नोव्हेंबर रोजी रात्री अहिल्यानगर एसटी डेपोमधून परभणी ते मुंबई सेंट्रल जाणाऱ्या एसटी बसवरील (क्र.एम एच १३ सीयु ८१४३) चालक बदल (स्कू चेंज) झाल्याने, बसस्थानकावरून वाहक प्रल्हाद गोपाळराव कराळे व प्रवाशांसह मुंबईकडे निघाल होते. रात्री १२.४५ वाजण्याच्या सुमारास बस कायनेटिक चौक येथे आली असता, एक पादचारी कोणत्याही वाहनांकडे न बघता अचानक रस्ता ओलांडत होता. त्यामुळे फिर्यादीने बस थांबवून खाली उतरून त्या इसमास तुला बस बघता येत नाही का? असे विचारले.


यावरून दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची होऊन झटापट झाली. यादरम्यान दोघांचे मोबाईल खाली पडले व जमलेल्या लोकांनी ते आपापसात परत केले. त्यानंतर एसटी पुढे नेल्यानंतर त्यातील एका इसमाने फोन करून शिवीगाळ करत पुन्हा कायनेटिक चौकात बोलावले. फिर्यादीने बस चौकात नेऊन बाजूला उभी केली असता, 'सोनु' नावाचा तरुण व त्याचा एक मित्र तिथे आले. त्यांनी सरकारी कर्मचारी असून तू वाद का घालतोस, एसटीमधील प्रवाशांना जाण्यास उशीर होत आहे, असे म्हणत फिर्यादीला व वाहक प्रल्हाद कराळे यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

मारहाणीदरम्यान सोनु नावाच्या इसमाने खाली पडलेला दगड उचलून फिर्यादीच्या उजव्या कपाळावर मारला, ज्यामुळे डोक्यातून रक्तस्त्राव होऊ लागला. दरम्यान, बसमधील प्रवासी व वाहकाने भांडण सोडवले आणि डायल ११२ वर फोन करून पोलिसांना बोलावून घेतले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून एका हल्लेखोराला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींची नावे सोनु उर्फ रुपेश भालेराव आणि विकी कैलास वाघ (दोघे रा. रेल्वे स्टेशन रोड, अहिल्यानगर) असल्याचे समोर आले. जखमी चालकाने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक बडे करत आहेत.

नगरमध्ये १४ नोव्हेंबरपासून संगीतमय श्रीराम कथेला प्रारंभ

अजयबुवा रामदासी यांच्या रसाळ वाणीतून श्रीरामचरित्राचा भक्तिरसपूर्ण जागर

नगर – कार्तिक महिन्याचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरात संगीतमय श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे. १४ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड येथील कथाकार अजयबुवा रामदासी यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीराम कथेचे निरूपण होणार आहे. बालिकाश्रम रोड येथील ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज यांच्या चिंतामणी उपासना केंद्रात दररोज सायंकाळी ४.३० ते ८.३० या वेळेत कथा होणार आहे.

श्रीरामाच्या जीवनातील आदर्श, त्याग, कर्तव्यनिष्ठा, भक्ती आणि मर्यादा पुरुषोत्तम या स्वरूपाचे महत्त्व कथेतून उलगडले जाणार आहे. संगीताच्या माध्यमातून सादर होणाऱ्या या कथेमुळे भाविकांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळणार आहे.

१४ नोव्हेंबर रोजी कार्तिक शुद्ध पंचमीला कथेचा प्रारंभ होणार असून २२ नोव्हेंबर रोजी कार्तिक शुद्ध त्रयोदशीला सांगता होणार आहे. या श्रीराम कथेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

चटणी–भाकर खाऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारचा निषेध



नगर – महाराष्ट्रातील भीषण दुष्काळी परिस्थिती, शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाची होत असलेली होरपळ याकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रमक काळी दिवाळी आंदोलन करण्यात आले. केंद्रीय समिती सदस्य प्रा. किसन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यात आला. यावेळी आंदोलकांनी चटणी–भाकर खाऊन बळीराजा आणि कष्टकरी बांधवांच्या वेदनांशी एकरूप होत अनोख्या पद्धतीने काळी दिवाळी साजरी केली. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री यांच्या नावे जिल्हा प्रशासनाला देण्यात आले.

दुष्काळग्रस्तांना तातडीने दिलासा देण्यासाठी कुंभमेळ्यासाठी राखीव ठेवण्यात आलेला ३५ हजार कोटी रुपयांचा निधी दुष्काळ निवारणासाठी खर्च करावा, संपूर्ण दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, बाधित पिकांसाठी प्रतिहेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची मोफत व नियमित व्यवस्था करावी, दलित–आदिवासी वस्त्यांसाठी स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना मंजूर कराव्यात, सहकारी संस्था, बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली थांबविण्यासाठी शासन निर्णय काढावा, ग्रामीण व शहरी भागातील सर्व कर रद्द करावेत, अशा मागण्या करण्यात आल्या. तसेच विद्यार्थी, बांधकाम कामगार, पेंटर, कंत्राटी मजूर, तृतीयपंथी, अनाथ, एकल महिला, विधवा, निराधार, भटके–विमुक्त आणि स्थलांतरित कामगारांसाठी विशेष आर्थिक मदत व सुरक्षा योजना राबविण्याची मागणीही करण्यात आली.

मंत्र्यांच्या घरावर बिऱ्हाड मोर्चे

दुष्काळग्रस्तांच्या मागण्यांची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. पुढील काळात अन्न–पाण्याची व्यवस्था झाली नाही, तर भाजपचे मंत्री, खासदार, आमदार आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या घरांवर ‡बिऱ्हाड मोर्चे‡ काढण्यात येतील. तसेच जनतेच्या पिण्याच्या पाण्याची आणि अन्नाची व्यवस्था करण्यास त्यांना बाध्य केले जाईल, असा इशाराही वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आला.

या आंदोलनात केंद्रीय समिती सदस्य प्रा. किसन चव्हाण, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जामखेड नगरसेविका संगीताताई भालेराव, सूरज भालेराव, पोपट शेटे, चंद्रकांत पातारे, राजीव भिंगारदिवे, हनीफ शेख, मनोज साळवे, दीपक साहेबराव चांदणे, जिल्हा सल्लागार शिरसाठ जे. डी., प्रा. दादा समुद्र आणि संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप यादव यांनी जाहीर पाठिंबा देत सहभाग नोंदविला. याशिवाय शाहूराव खंडागळे, बन्नू शेख, संतोष जैंजाळ, गणेश साहेबराव फाजगे, रविंद्र जैंजाळ, अविनाश धनवे, अरुण झांबरे, प्रज्योत शिर्के, सुशील साळवे, चंद्रकांत नेटके, प्रतिक जाधव, संदीप पवार, संदिप ठोंबे, योगेश शिंगाडे, रविंद्र शिरसाठ, देविदास भालेराव, पृथ्वीराज काळे, प्रशांत शिंदे, रंजित मेघडबर, अतिश पारवे, राजन मेघदंबर, प्रेम जाधव, पातारे विकास, किशोर शिंदे, गणेश सूर्यवंशी, यश शिंदे, प्रथमेश शिंदे, पार्थ शिंदे, संदेश शिंदे, साहिल शेख, सौरभ सातपुते, सुनिल ठोकळ, सार्थक भराटे, अनुराज आंधळे, सिद्धार्थ बारगजे, ईश्वर बारसकर, पप्पू चव्हाण, पोपटराव थोरात आदी उपस्थित होते.

बूथ हॉस्पिटलमध्ये १४ नोव्हेंबर रोजी मोफत वैद्यकीय व दंत तपासणी शिबिर

नगर – दि साल्वेशन आर्मी इव्हेंजलिन बूथ हॉस्पिटल, अहिल्यानगर (दगडी दवाखाना) यांच्या वतीने बालदिनानिमित १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत सर्व लहान मुलांसाठी व संडे स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत व संपूर्ण शारीरिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती हॉस्पिटलचे प्रशासक मेजर सुरेंद्र चोपडे यांनी दिली आहे.

यामध्ये बालरोगतज्ज्ञ डॉ. शहनाज अय्युब व दंतचिकित्सक डॉ. ममता कांबळे मुलांची तपासणी करणार आहेत. दातांना कीड लागणे, दात दुखणे, दातांमध्ये सिमेंट भरणे तसेच पुढे–मागे किंवा वाकडे–तिकडे आलेले दात सरळ करण्याबाबत मार्गदर्शन आणि दातांच्या इतर सर्व समस्यांची तपासणी केली जाईल. तसेच शरीराशी संबंधित कोणत्याही आजाराची किंवा आरोग्यविषयक तक्रारीची तपासणी व योग्य मार्गदर्शन मोफत करण्यात येणार आहे.

शिबिरामध्ये सर्व प्रकारची वैद्यकीय व दंत तपासणी मोफत करण्यात येईल. तपासणीनंतर आवश्यक असल्यास रक्ताच्या चाचण्या, रक्तदाब तपासणी, दंतोपचार तसेच इतर आवश्यक उपचार अल्प दरात उपलब्ध करून दिले जातील.

शिबिराचे स्थळ: दि साल्वेशन आर्मी इव्हेंजलिन बूथ हॉस्पिटल, अहिल्यानगर (दगडी दवाखाना), वेळ : सकाळी १० ते दुपारी २, संपर्क :– ०२४१–२३४५०५९ / ८७८८०४३९४३.

दुरुस्ती

मौजे केडगाव येथील स.नं./ग.क्र. १४९/१, याचे क्षेत्रफळ ० हे. ८१ आर यापैकी नगर – दौंड रस्त्यासाठी संपादित झालेले ० हे. ११ आर क्षेत्र सोडुन उर्वरीत संपुर्ण ० हे. ७० आर या शेतजमिन मिळकतीच्या खरेदी व्यवहारास अनुषंगुन दिनांक ०६/११/२०२३ रोजी दैनिक नवा मराठा या वृत्तपत्रामध्ये पान नं. ५ वर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये मिळकतीच्या चतु:सिमेत चुकुन दक्षिणेस :– गट क्रं./स.नं. १४९/१, असे प्रसीद्ध झाले होते. सदर जाहीर नोटीसीमध्ये मिळकतीच्या चतु:सिमेत दक्षिणेस :– गट क्रं./स.नं. १४९/२, असे वाचावे.

ॲड. शामसुंदर व्हि. भुतडा
ऑफिस : शॉप नं. ९, पुजा अपार्टमेंट
सहकार सभागृह रोड, अहमदनगर मो. ९४२३७९२९२२

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकत विद्यमान मालक **शेख हजराबी शेख इकबाल**, रा. घर नं. ३४१/३, प्लॉट नं. १३, बडी मरियम मस्जिद जवळ, अभिलाषा कॉलनी, नविन मुकुंदनगर, अहिल्यानगर यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर केला असुन सदरची मिळकत कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसाराची रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई, बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन –
जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिंगार येथील प्लॉट व त्यावरील बांधकामासह रो–हाऊस मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

स.नं.	प्लॉट नं.	क्षेत्रफळ
३४१/३	१३	१७२.०५ चौ.मीटर

हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील आर. सी. सी. स्ट्रक्चर फ्रेममधील तळ मजल्यावरील ४ दुकान, १ हॉल, ३ बेडरुम, १ किचन, संडास – बाथरुम याचे बांधकामाचे ७५.४० चौ. मी. असुन अशी संपुर्ण बांधकामासह व यातील २ इलेक्ट्रीक मीटर, पाण्याचे नळ कनेक्शन, बोअरींग व पाण्याच्या मोटरसह मिळकतीबाबत.

यांसी चतु:सिमा :–
पुर्वेस – प्लॉट नं. २३ दक्षिणेस – ९ मी. रोड
पश्चिमेस – ६ मी. रोड उत्तरेस – प्लॉट नं. १४
दि. १३/११/२०२६, अहमदनगर.

ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख (बीएएलएलबी)
ॲड. कुरेशी फैजान फारुक (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता– जीपीओ रोड, जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०, ७७०९७८६३१३

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली प्लॉट मिळकत विद्यमान मालक **१.फैयाझ अब्दुलरहेमान शेख २.वसिम महेमूद शेख ३.एजाज हुसेन सय्यद ४.फरहान एजाज सय्यद सर्व रा. मुकुंदनगर अहिल्यानगर/अहमदनगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन विद्यमान मालक यांनी सदर प्लॉट मिळकत आमचे अशिलांना कायमखुष खरेदी देण्यांचे ठरले असुन विसाराची रक्कम देखील घेतलेली आहे. तसेच सदर प्लॉट मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर प्लॉट मिळकत बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेहीहक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :डि.।। अहिल्यानगर, सब. डि.।। ता. नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी येथील खुल्या प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

स. नं.	प्लॉट नं.	चौ.मी.
६५/१३अ/६६/१	९६	२६०.००

या पैकी उत्तरबाजुकडील प्लॉट त्याचे क्षेत्र १३०.०० चौ.मी. प्लॉट मिळकतीबाबत.

यांसी चतुःसिमा
पुर्वेस :– १२मी. रुंद रस्ता दक्षिणेस :– प्लॉट नं. ९६पैकी
पश्चिमेस :– लागु सर्व्हे नंबर उत्तरेस :– प्लॉट नं. १
येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. १३/११/२०२६,अहमदनगर.

ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख (बीएएलएलबी)
ॲड. फैजान फारुक कुरेशी (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **मे सिध्दम डेव्हलपर्स मे प्रितम रचना असोसिएट रा. अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात **(७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी.अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :– डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगरपैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे सावेडी येथील सर्व्हे क्र. ८२/ब१/२अ २ब २क २ड २इ/८२/ब२व१ब/१ते४/८२/ब२व१अ/ प्लॉट नं. १०८ याचे क्षेत्र १६०.०० चौ. मी. हा संपूर्ण प्लॉट.

यांसी चतु:सिमा :–
पुर्वेस : ९ मी. रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. १०९,
पश्चिमेस : सर्व्हे नं.८२ पै मंजुर रेखांकन, उत्तरेस : प्लॉट नंबर १०७,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर दिनांक :– १३/११/२०२६

ॲड. औंकार पंडीत मोरे
ऑफिस– फ्लॅट नंबर ४, गुरुप्रसाद अपार्टमेंट,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर मो.नं. ९६७३७८४२७९

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत या विद्यमान मालक **संतोष शिवाजी लोणकर रा. १३ ए कौशिक तार कॉलनी, भिस्तबाग रोड, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विदयमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असुन लवकरच खरदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात **(७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी, अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :– डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. १२/३ यामधील प्लॉट नं. २४ते ३०/२ याचे क्षेत्र ६८.७५ चौ. मी. ही संपूर्ण प्लॉट मिळकत व त्यावरील कुसुम–पार्वती रो रेसिडेन्सी मधील रो रेसिडेन्सी नं. २ याचे आर. सी. सी. स्ट्रक्चरचे तळ मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ३४.३७५ चौ. मी.+ पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र ३६.८०५ चौ.मी. असे एकूण बांधकाम क्षेत्र ७१.१८ चौ.मी. ही संपुर्ण मिळकत.

यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे,
पुर्वेस :– लागु सर्व्हे नं. १२ पै.
दक्षिण :– प्लॉट नं. २४ते ३०/३ (रो रेसीडेन्सी नं. ३),
पश्चिमेस :– रस्ता, उत्तरेस :प्लॉट नं. २४ ते ३०/१ (रो रेसीडेन्सी नं. १)
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर दिनांक:– १३/११/२०२६

ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
ॲड. औंकार पंडीत मोरे
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

जाहीर प्रगटन

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत
वक्फ संस्थेचे नाव व पत्ता– Markaz Masjid Kukana, At. Kukana Ta. Newasa, Dist- Ahilyanagar

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य मंडळात क्र. MSBW/ADR/1152/2025 अन्वये नोंदणीकृत असून अर्जदार मुसा मुणीर इनाम दार व इतर यांनी दि.१६/०६/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्ताचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने नवीन सदस्यांची नियुक्ती करतील. योजनेमध्ये नमुद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	नाव	पद
१	मुसा मुणीर इनामदार	अध्यक्ष
२	मतीनशहा अहमदशा इनामदार	उपाध्यक्ष
३	सलीमशा अकबरशा शहा	खजिनदार
४	समीर अहमद शहा	सचिव
५	शकील अल्लाबक्ष इनामदार	सल्लागार
६	जब्बार निजाम इनामदार	सदस्य
७	जब्बारा बाबुलाल इनामदार	सदस्य

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रार, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर पत्ता सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर ४१४००३ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

२. नोटीस बोर्ड, वक्फ संस्था मर्कज मस्जिद कुकाणा, मौजे. कुकाणा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. ३. अर्जदार श्री. मुसा मुणीर इनामदार रा. मौजे. कुकाणा, ता. नेवासा जि.अहिल्यानगर पाठविलेल्या प्रस्तावीत योजना अर्ज दिनांक १६/०६/२०२६ रोजीच्या अनुषंगाने त्यांना आदेशीत करण्यात येत कि. या योजने बाबतचे जाहीर प्रकटन स्थानिक वृतपत्रामध्ये प्रसिध्द करावे व त्याची एक प्रत वक्फ संस्थेच्या सुचनाफलाकावर डकवुन त्याचा रितसर पंचनामा करावा व आक्षेपाची मुदत संपल्यानंतर वृतपत्राच्या पुन ती ल पंचर व पंचनाम्याचे दस्तऐवज या कार्यालयात सादर करावेत. सदर जाहीर प्रकटन वृत्तापत्रात प्रसिद्ध करण्याचा खर्च अर्जदाराने स्वत: करावयाचा आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ जिला वक्फ अधिकारी अहिल्यानगर कडुन यासाठी कोणताही खर्च केला जाणार नाही.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ पडळ. छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव

(इम्रान महेमुद शेख)
जिल्हा वक्फ अधिकारी
अहिल्यानगर

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **नंदकुमार पांडुरंग हजारे रा. हजारे मळा, नागरदेवळे, अहमदनगर** यांच्या मालकी वहिवाटीची असून, सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

परिशिष्ट
मिळकतीचे वर्णनः– जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा परिषद हद्दीतील मौजे भिंगार येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.
गट नं. २११/३ चे क्षेत्र ०हे.६२आर + पो.ख. ० हे. ०४आर याचा आकार ०रु.५१पै. या संपुर्ण जमिन मिळकतीबाबत.
यासी चतुःसिमा–
पुर्वेस – अरुण पांडुरंग हजारे यांची मिळकत दक्षिणेस – गट नं. २९२
पश्चिमेस – रमेश पांडुरंग हजारे यांची मिळकत
उत्तरेस – शेख ईन्नुस इब्राहीम व साजिदअली मुजीरअली काझी यांची मिळकत
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दिनांक १३/११/२०२६

ॲड. तनवीर एम.शेख नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ॲड. फरहान आसिफ शेख
कस्तुरी प्लाझा शेजारी, डावरे गल्ली, अहमदनगर मो.नं.९२७०४६४६००/९७६६१४५९३२

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

ना 'एन्ट्री गेट', ना 'एक्झिट'!

रेल्वे प्रवास हा सर्वात स्वस्त आणि विश्वासार्ह मानला जातो. रेल्वेने प्रवास करताना मोठी स्टेशन्स, गर्दी, प्लॅटफॉर्म, लिफ्ट आणि एस्केलेटर पाहणे ही सामान्य बाब आहे. प्रत्येक स्टेशनवर प्रवाशांच्या येण्या-जाण्यासाठी स्पष्टपणे 'एन्ट्री' आणि 'एक्झिट' गेटसब असतात; पण जगात एक असे अनोखे स्टेशन आहे, जिथे ना प्रवेशद्वार आहे, ना बाहेर जाण्याचा रस्ता! ऐकायला थोडे विचित्र वाटले तरी हे सत्य आहे.

हे अनोखे रेल्वे स्टेशन सामान्य स्टेशनपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. येथे बाहेरून कोणताही प्रवासी स्टेशनवर येऊ शकत नाही आणि ट्रेनमधून उतरून कोणीही बाहेर जाऊ शकत नाही. म्हणजेच स्टेशनवर पोहोचण्याचा आणि तिथून निघण्याचा एकमेव मार्ग म्हणजे 'ट्रेन' हाच आहे. प्रवासी ट्रेनमधून उतरतात, प्लॅटफॉर्मवर थोडा वेळ घालवतात आणि पुन्हा त्याच किंवा पुढच्या ट्रेनने प्रवासाला निघतात. विशेष म्हणजे येथे तिकीट काऊंटर किंवा स्टेशनची कोणतीही इमारत नाही. हे अनोखे स्टेशन भारतात नसून जपानमध्ये आहे. दक्षिण जपानमधील निशिकीगावा शिरयू लाईनवर असलेले हे स्टेशन आपल्या आगळ्यावेगळ्या रचनेसाठी प्रसिद्ध आहे. या स्टेशनचे नाव 'शिरयू-मिहार्शी.' येथे केवळ एकच प्लॅटफॉर्म बांधण्यात आला आहे.



जपान आपल्या नवनवीन प्रयोगांसाठी ओळखला जातो आणि हे स्टेशन त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. असे स्टेशन बांधण्यामागे एक खास उद्देश आहे. शिरयू-मिहार्शी स्टेशन हे सामान्य प्रवासासाठी नसून पर्यटनासाठी बनवले गेले आहे. हे स्टेशन 'निशिकी' नदीच्या अगदी वर बांधण्यात आले आहे. प्लॅटफॉर्मवरून नदी, सभोवतालचे घनदाट जंगल आणि निसर्गरम्य दृश्यांचा आनंद घेता येतो. ट्रेन येथे साधारणपणे १० मिनिटे थांबते. या काळात प्रवासी प्लॅटफॉर्मवर उतरून निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवतात, फोटो काढतात आणि पुन्हा ट्रेनमध्ये बसतात. केवळ निसर्गाचे सौंदर्य पाहता यावे आणि प्रवाशांना काही काळ मानसिक शांतता मिळावी, याच हेतूने हे स्टेशन तयार करण्यात आले आहे. त्यामुळेच येथे बाहेर जाण्यासाठी रस्ता ठेवण्यात आलेला नाही. ◆◆◆

मृत्यूनंतर काय होते?

आपल्याकडे स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा तीन प्रकारच्या शरीरांचा उल्लेख आहे. जो डोळ्यांना दिसतो तो (पंचीकृत) पंचमहाभूतांनी बनलेला स्थूल देह. पंचमहाभूतांच्या तसेच ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रियांच्या सुक्ष्मांशाने बनलेला सूक्ष्म देह (हा आपल्याला दिसत नाही) तसेच अज्ञानरूप कारण देह अशा देहांचे वर्णन भारतीय आध्यात्मिक ग्रंथांमध्ये आहे. सूक्ष्म देहाने जिवंतपणीही स्थूल देहाच्या बाहेर पडून परत येता येते, असे सांगणारे अनेक योगी आहेत. या देहांना अखंड अशा चेतन आत्मतत्त्वाचे अधिष्ठन असते व त्यामुळेच ते कार्यरत असतात.



स्थूल देहापासून सूक्ष्म देहाचा जोडलेला संबंध तुटणे म्हणजे मृत्यू. त्यावेळी सूक्ष्म देह कायमस्वरूपी स्थूल देहाला सोडून बाहेर जातो, असे म्हटले जाते. जगभरात अशा सूक्ष्म देहाने बाहेर पडून पुन्हा स्थूल देहात आलेल्या लोकांनी काही अनुभव सांगितलेले आहेत. त्याला 'निअर डेथ एक्सपिरियन्स' किंवा मृत्यू निकट असताना आलेले अनोखे अनुभव म्हटले जाते. आता त्याबाबत वैज्ञानिक संशोधनही करण्यात आले आहे. मात्र, त्याच्या निष्कर्षांवरून संशोधकांमध्येच दोन गट पडले आहेत!

'वॉशिंग्टन पोस्ट'मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार, मृत्यूच्या दारातून परत आलेल्या लोकांच्या अनुभवांच्या कारणांबाबत शास्त्रज्ञांमध्ये मोठी चर्चा रंगली आहे. व्हर्जिनियामध्ये राहणाऱ्या ७७ वर्षीय मियाशा गिलियम-एल यांचा अनुभव थक्क करणारा आहे. २०१२ मध्ये प्रसूतीनंतर त्यांच्या हृदयाचे स्नायू कमकुवत झाले आणि त्यांचे हृदय धडधडणे बंद झाले. मियाशा सांगतात की, त्या क्षणी त्यांनी स्वतःला स्वतःच्या शरीराबाहेर पडताना पाहिले. डॉक्टर त्यांच्या छातीवर दाब देऊन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यानंतर त्यांना एका अंधाऱ्या बोगद्यातून प्रवास केल्याचा आणि अत्यंत शांततेचा अनुभव आला. गेल्यावर्षी बेल्जियम, अमेरिका आणि डेन्मार्कमधील शास्त्रज्ञांच्या पथकाने 'नेपच्यून' नावाचे एक मॉडेल सादर केले. या मॉडेलनुसार, जेव्हा हृदय आणि मेंदू थांबतो, तेव्हा रक्तातील ऑक्सिजन कमी होतो आणि कार्बन डायऑक्साईड वाढतो.

यामुळे मेंदूच्या 'टेम्पोरोपॅरिएटल जंक्शन' या भागात बिघाड होतो. याच प्रक्रियेमुळे माणसाला आपण शरीराबाहेर आहोत असा भास होतो. मेंदूतील रसायनांच्या बदलामुळे शांतता वाटणे किंवा चमकणारा बोगदा दिसणे या निव्वळ जैविक प्रक्रिया आहेत. व्हर्जिनिया विद्यापीठाचे संशोधक ब्रूस ग्रेसन आणि मारिएटा पेहलिवानोवा यांनी या मॉडेलला आव्हान दिले आहे. त्यांच्या मते, मेंदूतील हालचालींमुळे भास का होतात हे समजू शकते; पण रुग्णांनी शुद्धीवर आल्यावर सांगितलेल्या 'सत्य' गोष्टींचे काय? अनेक रुग्णांनी शरीर पूर्णपणे निकामी असतानाही, त्या खोलीत किती लोक होते आणि काय बोलत होते, याची अचूक माहिती दिली आहे, जी विज्ञानाच्या सध्याच्या चौकटीत बसत नाही. ४,००० हून अधिक अशा प्रकरणांचा अभ्यास करणारे रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट जेफरी लॉंग म्हणतात की, हे अनुभव केवळ मेंदूची कल्पना नसून मानवतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. मुख्य प्रश्न हा आहे की, शरीराच्या मृत्यूनंतरही आपले अस्तित्व राहते का? ◆◆◆

वाया जाणाऱ्या उष्णतेपासून वीजनिर्मिती

ऊर्जेची वाढती गरज आणि पर्यावरणाचे रक्षण या दिशेने जपानमधील शास्त्रज्ञांनी एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. कारखाने आणि इंजिनांमधून वाया जाणारी उष्णता आता थेट विजेमध्ये रूपांतरित करता येईल, असे तंत्रज्ञान संशोधकांनी विकसित केले आहे. साधारणपणे कारखान्यांमधील २० ते ५० टक्के ऊर्जा उष्णतेच्या स्वरूपात वाया जाते, जी आता सत्कारणी लागणार आहे. शास्त्रज्ञांनी या संशोधनासाठी 'मॉलिब्डेनम डिसिलिसाइड' (MoSi2) नावाच्या एका विशेष पदार्थाचा अभ्यास केला आहे. हा एक 'थर्मोइलेक्ट्रिक' पदार्थ आहे, ज्यामध्ये तापमानातील फरकाचे रूपांतर विजेमध्ये करण्याची क्षमता आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही बाह्य चुंबकीय क्षेत्राशिवाय हा धातू अत्यंत अचूकपणे काम करतो, ज्यामुळे भविष्यातील उपकरणांसाठी तो अत्यंत प्रभावी ठरणार आहे. आतापर्यंत वीज निर्मितीसाठी वापरली जाणारी उपकरणे अनेक थरांनी बनलेली असायची, ज्यामुळे विजेच्या प्रवाहात अडथळा येत असे आणि ऊर्जेचे नुकसान व्हायचे. मात्र, शास्त्रज्ञांनी MoSi2 ची एक पातळ फिल्म तयार केली आहे.

यामुळे ऊर्जेचे नुकसान कमी होते. तसेच कमी खर्चात जास्त वीज निर्मिती शक्य होते. मोठ्या क्षेत्रावर याचा वापर करता येतो. या प्रक्रियेला शास्त्रज्ञांनी अऊउझ असे नाव दिले आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, जेव्हा या पदार्थाचे एक टोक गरम आणि दुसरे टोक थंड ठेवले जाते, तेव्हा त्यातील इलेक्ट्रॉन्स गरम टोकाकडून थंड टोकाकडे वेगाने धावू लागतात. या हालचालीमुळे व्होल्टेज निर्माण होतो आणि वीज तयार होते. हे संशोधन केवळ मोठ्या कारखान्यांपुरते मर्यादित नाही, तर याचे अनेक फायदे आहेत. पोर्टेबल सेन्सर्स : छोटे सेन्सर्स चालवण्यासाठी याचा वापर करता येईल. दुर्गम भाग : ज्या भागात वीज पोहोचवणे कठीण आहे, तिथे उष्णतेचा वापर करून उपकरणे स्वतःला चार्ज ठेवू शकतील. प्रदूषण मुक्त ऊर्जा : हे तंत्रज्ञान पूर्णपणे शाश्वत आणि प्रदूषणविरहित आहे. जपानच्या शास्त्रज्ञांचे हे संशोधन 'कम्युनिकेशन्स मटेरियल्स' या प्रसिद्ध जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. यामुळे भविष्यात जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होऊन स्वच्छ आणि हरित ऊर्जेकडे आपली वाटचाल सुलभ होणार आहे.

पेनड्राईव्हवरील दोन छिद्रांचे काम काय?

आजच्या डिजिटल युगात 'पेनड्राईव्ह' ही आपली महत्त्वाची गरज बनली आहे. दिसायला लहान असलेल्या या उपकरणात आपण मोठ्या फाईल्स साठवून ठेवतो. पण तुम्ही कधी पेनड्राईव्हकडे बारकाईने पाहिले आहे का? पेनड्राईव्हच्या धातूच्या भागावर दोन लहान चौकोनी छिद्रे असतात. आपल्यापैकी अनेकजण याला केवळ डिझाईनचा भाग समजून दुर्लक्ष करतात; पण ही छिद्रे पेनड्राईव्ह सुरक्षित ठेवण्यासाठी आणि डेटा ट्रान्स्फरसाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.



घट्ट फिटिंगसाठी उपयुक्त जेव्हा तुम्ही पेनड्राईव्ह कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपच्या पोर्टमध्ये लावता, तेव्हा पोर्टमधील धातूचे दोन छोटे फुगवटे या छिद्रांमध्ये जाऊन अडकतात. यामुळे पेनड्राईव्ह पोर्टमध्ये घट्ट बसतो आणि त्यातील मेटल पॉईंटसब यंत्रणेशी व्यवस्थित जोडले जातात. यामुळे पेनड्राईव्ह हलत नाही आणि संपर्क तुटत नाही. योग्य दिशा ओळखण्यात मदत अनेकदा पेनड्राईव्ह उलटा की सुलट हे समजणे कठीण होते. अशा वेळी ही छिद्रे दिशा दाखवण्याचे काम करतात. बहुतांश पेनड्राईव्हमध्ये ज्या बाजूने या छिद्रांमधून आरपार दिसते, ती बाजू वरची किंवा सुलट असते. यामुळे पोर्ट खराब होण्याचा धोका टळतो.


सुरक्षित डेटा ट्रान्स्फर जर पेनड्राईव्ह पोर्टमध्ये सैल बसला, तर डेटा ट्रान्स्फरमध्ये अडथळा येऊ शकतो किंवा फाईल करप्ट (खराब) होऊ शकते. ही छिद्रे कनेक्टरला घट्ट पकडून ठेवतात, ज्यामुळे डेटाची देवाणघेवाण विनाअडथळा पार पडते. यूएसबीचे डिझाईन णडइ- खऋ नावाच्या एका जागतिक संस्थेद्वारे निश्चित केले जाते. जगभरातील कंपन्या याच मानकांचे पालन करतात. म्हणूनच तुम्ही कोणत्याही ब्रँडचा पेनड्राईव्ह विकत घेतला, तरी तो कोणत्याही लॅपटॉप किंवा उपकरणाला सहज फिट होतो.

हे एक जागतिक मानक असल्यामुळे सर्व पेनड्राईव्हवर ही छिद्रे पाहायला मिळतात. पेनड्राईव्हच्या आत असलेला प्लास्टिकचा भाग बाहेरील धातूच्या आवरणाशी घट्ट जोडण्यासाठी ही छिद्रे 'अँकर'सारखे काम करतात. यामुळे पेनड्राईव्हची अंतर्गत रचना जागेवर स्थिर राहते आणि तो लवकर खराब होत नाही. तसेच, चिप गरम झाल्यावर निर्माण होणारा दबाव कमी करण्यासाठीही या छिद्रांचा थोड्या प्रमाणात उपयोग होतो. ◆◆◆

ताऱ्याचा आश्चर्यकारक 'पुनर्जन्म'

अंतराळातील सर्वात मोठ्या ताऱ्यांपैकी एक मानला जाणारा "WOH G64', ज्याला शास्त्रज्ञ प्रेमाने 'बेहेमथ स्टार' म्हणतात, त्याच्या विनाशाबद्दलची जुनी भाकिते चुकीची ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नवीन अभ्यासानुसार, हा तारा मरणासन्न अवस्थेत नसून एका वेगळ्याच प्रक्रियेतून जात आहे. तो जणू काही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून झेप घेत आहे. त्याचा चक्क 'पुनर्जन्म' होत आहे!

हा तारा पृथ्वीपासून सुमारे १,६३,००० प्रकाशवर्षे दूर 'लार्ज मॅगेलॅनिक क्लाऊड' या बटू आकाशगंगेत स्थित आहे. तो सूर्यापेक्षा साधारणत: १,५०० पट जास्त रुंद असून, विश्वातील सर्वात मोठ्या शोधलेल्या तार्‍यांपैकी एक आहे. याचे तेज आपल्या सूर्यापेक्षा २,८२,००० पट जास्त आहे. गेल्या काही वर्षांत "WOH G64' ताऱ्याचे तेज लक्षणीयरीत्या कमी झाले होते. जेव्हा एखादा 'रेड सुपरजायंट' तारा त्याचे बाहेरील वायूचे थर फेकून देतो आणि त्याचे तेज कमी होते, तेव्हा तो 'सुपरनोव्हा' स्फोटाच्या शेवटच्या टप्प्यात असल्याचे मानले जाते.




नोव्हेंबर २०२४ मध्ये चिलीतील 'व्हेरी लार्ज टेलिस्कोप'ने टिपलेल्या छायाचित्रात या ताऱ्याभोवती वायू आणि धुळीचे 'अंड्यासारखे कवच' दिसले होते, ज्यामुळे शास्त्रज्ञांना वाटले की, हा तारा आता स्फोट होऊन संपणार आहे. मात्र, ७ जानेवारी रोजी 'मंथली नोटीस ऑफ द रॉयल ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटी'मध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासाने हे चित्र पालटले आहे. दक्षिण आफ्रिकेतील 'सॉल्ट' टेलिस्कोपचा वापर करून शास्त्रज्ञांनी ताऱ्याच्या वातावरणात 'टायटॅनियम ऑक्साईड' शोधले आहे. हे रसायन केवळ 'रेड सुपरजायंट' ताऱ्यांमध्येच आढळते. याचा अर्थ असा की, तार्‍याने त्याचे स्वरूप बदललेले नाही.

यावर कील विद्यापीठाचे खगोल भौतिकशास्त्रज्ञ जॅको व्हॅन लून म्हणाले, 'याचा अर्थ असा की, "WOH G64' हा अजूनही 'रेड सुपरजायंट' आहे आणि तो कधीच बदलला नव्हता. आम्ही एका प्रकारे राखेतून झेप घेणाऱ्या फिनिक्स पक्षाचा अनुभव घेत आहोत.' या ताऱ्याचे तेज कमी होण्यामागे त्याचा अंत हे कारण नसून त्याच्या जवळ असलेला एक छोटा आणि अदृश्य जोडीदार तारा असू शकतो. हा छोटा तारा मोठ्या ताऱ्याचे बाह्य थर हळूहळू स्वतःकडे ओढून घेत असावा, ज्यामुळे हा महाकाय तारा 'कॅनिबलाईज्ड' (स्वतःच्याच जातीच्या घटकाकडून गिळंकृत) होत असल्याचा संशय शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. ◆◆◆

'ब्लॅक ब्युटी' उल्केत प्राचीन पाण्याचा अंश

मंगळ ग्रहाचा तुकडा असलेल्या आणि 'ब्लॅक ब्युटी' या नावाने प्रसिद्ध असलेल्या एका प्राचीन उल्केमध्ये पाण्याचे अस्तित्व असल्याचे पुरावे शास्त्रज्ञांना सापडले आहेत. विशेष म्हणजे, या उल्केचा कोणताही भाग नष्ट न करता 'न्यूट्रॉन स्कॅनिंग'च्या साहाय्याने हे पाणी शोधण्यात यश आले आहे.



या उल्केचे अधिकृत नाव 'छथअ ७०३४' असे आहे. २०११ मध्ये मोरोक्कोच्या सहारा वाळवंटात भटक्या जमातींना हा साधारणत: ३२० ग्रॅम वजनाचा खडक सापडला होता. शास्त्रज्ञांच्या मते, हा कोळशासारखा दिसणारा खडक किमान ४.४४ अब्ज वर्षे जुना आहे. मंगळावरून मिळालेली ही आजवरची सर्वात जुनी उल्का आहे. हा खडक मंगळावरील 'कराठा' विवरातून सुमारे ५० ते १०० लाख वर्षांपूर्वी अवकाशात फेकला गेला असावा आणि नंतर तो पृथ्वीवर कोसळला. यापूर्वी २०१३ मध्येही या उल्केत पाण्याचे अंश सापडले होते; परंतु ते तपासण्यासाठी उल्केचे छोटे तुकडे करून ते नष्ट करावे लागत असत.

मात्र, १३ जानेवारी रोजी 'रीदर्ळी' सर्व्हरवर प्रसिद्ध झालेल्या नवीन अभ्यासानुसार, आधुनिक स्कॅनिंगमुळे या उल्केतील पाण्याचे संपूर्ण विश्लेषण करणे शक्य झाले आहे. या संशोधनातून समोर आले आहे की, १) 'ब्लॅक ब्युटी'च्या एकूण वस्तुमानापैकी साधारणत: ०.६ टक्के हिस्सा पाण्याचा आहे. २) हे प्रमाण पूर्वीच्या अंदाजापेक्षा खूप जास्त आहे. ३) हे पाणी अंशतः गरम असावे असे संकेत मिळाले आहेत, ज्यामुळे तिथे सूक्ष्मजीवांच्या अस्तित्वासाठी अनुकूल परिस्थिती असावी, अशी शक्यता बळावली आहे.

संशोधनाचे महत्त्व : जॉन्स हॉपकिन्स आणि इतर संस्थांच्या संशोधकांच्या मते, या शोधामुळे मंगळावर एकेकाळी उष्ण पाण्याचे प्रवाह होते, या सिद्धांताला बळकटी मिळाली आहे. जर तिथे पाणी गरम होते, तर मंगळावर एकेकाळी सूक्ष्मजीव अस्तित्वात असण्याची दाट शक्यता आहे. ◆◆◆

तरुणाच्या शरीरात तोफगोळा

फ्रान्समधील तुलूझ शहरात एका २४ वर्षीय तरुणाच्या कृत्यामुळे डॉक्टरांसह संपूर्ण प्रशासनाची झोप उडाली. हा तरुण गंभीर अवस्थेत रुग्णालयात पोहोचला होता; मात्र जेव्हा डॉक्टरांनी त्याची तपासणी केली, तेव्हा जे समोर आले ते पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. या तरुणाच्या शरीरात पहिल्या महायुद्धाच्या काळातील एक 'आर्टिलरी शेल' (तोफेचा गोळा) अडकला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, हा तरुण असह्य वेदना होत असल्याने आपत्कालीन विभागात दाखल झाला होता. सुरुवातीच्या तपासणीत त्याच्या शरीरात एखादी मोठी वस्तू अडकल्याचे लक्षात आले. मात्र, शस्त्रक्रिया सुरू असताना डॉक्टरांना ८ इंच लांब तोफेचा गोळा आढळला. हा गोळा १९१८ मधील म्हणजेच पहिल्या महायुद्धाच्या काळातील होता. या गोळ्याचा स्फोट होण्याची शक्यता असल्याने डॉक्टरांनी तत्काळ पोलिसांना पाचारण केले. घटनेचे गांभीर्य ओळखून रुग्णालय प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण रुग्णालय रिकामे केले. अग्निशमन दल आणि बॉम्ब शोधक व बॉम्ब नाशक पथकाला तातडीने बोलावण्यात आले. बॉम्ब शोधक तज्ज्ञांनी घटनास्थळी पोहोचून गोळ्याची बारकाईने तपासणी केली. तो गोळा सक्रिय आहे की नाही, हे माहीत नसल्याने काही काळ वातावरणात प्रचंड तणाव होता. अखेर, तज्ज्ञांनी हा गोळा सुरक्षित असल्याचे स्पष्ट केले आणि डॉक्टरांच्या मदतीने तो शरीराबाहेर काढला. शस्त्रक्रियेनंतर या तरुणाची प्रकृती आता स्थिर असून, तो धोक्याबाहेर आहे. इतका जुना आणि धोकादायक गोळा शरीराच्या आत कसा पोहोचला, याचे गूढ अद्याप कायम आहे. काही फ्रेंच मीडिया रिपोर्ट्सनुसार, एखाद्या 'पार्टी स्टंट' दरम्यान हा प्रकार घडला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, फ्रान्सच्या कायद्यानुसार अशा प्रकारचे स्फोटक गोळे बाळगणे किंवा त्यांच्याशी छेडछाड करणे हा गंभीर गुन्हा आहे. पोलिस आता या तरुणाची चौकशी करत असून, त्याच्यावर कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे. ◆◆◆

खाडीतील मगरींचे साम्राज्य सेशेल्सपर्यंत


पश्चिम हिंदी महासागरातील सेशेल्स द्वीपसमूहात आढळणाऱ्या आणि आता नामशेष झालेल्या मगरींबद्दल शास्त्रज्ञांनी एक महत्त्वपूर्ण शोध लावला आहे. या मगरी आफ्रिकेतील 'नाईल' मगरी नसून, त्या खाडीतील किंवा खाऱ्या पाण्यातील मगरी होत्या, असे 'रॉयल सोसायटी ओपन सायन्स' या नियतकालिकात २८ जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालात म्हटले आहे.



व्हेरियन स्टेट कलेक्शन्स ऑफ नॅचरल हिस्ट्री येथील सरपटणाऱ्या प्राण्यांचे तज्ज्ञ आणि या अभ्यासाचे सह-लेखक फ्रँक ग्लॉ यांनी सांगितले की, 'सेशेल्समधील मगरींच्या या पूर्वजांनी हिंदी महासागरातून किमान ३,००० किलोमीटरचा (सुमारे १,८६४ मैल) प्रवास करून हा द्वीपसमूह गाठला असावा. कदाचित हा प्रवास त्यापेक्षाही मोठा असू शकतो.' २५० वर्षांपूर्वीच्या मोहिमेतील नोंदीनुसार, सेशेल्समध्ये एकेकाळी मगरींची मोठी संख्या होती. मात्र, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात जेव्हा मानवी वस्ती तिथे स्थिरावली, तेव्हा त्यांनी या सर्व मगरींचा नायनाट केला.

आज या मगरींचे केवळ काही अवशेष लंडन, पॅरिस आणि सेशेल्समधील संग्रहालयांत जतन केलेले आहेत. सुरुवातीला पाश्चात्त्य शास्त्रज्ञांना वाटले होते की, या मगरी आफ्रिकेतून आलेल्या 'नाईल' मगरी असाव्यात. १९९४ मध्ये त्यांच्या शारीरिक वैशिष्ट्यांवरून त्या 'खाडीतील मगरी' असाव्यात, असा अंदाज वर्तवण्यात आला होता. आता नवीन संशोधक पथकाने आनुवंशिक पुराव्यांच्या आधारे यावर शिक्कामोर्तब केले आहे. शास्त्रज्ञांनी संग्रहालयातील जुन्या कवट्या आणि दातांमधून 'मायटोकॉन्ड्रियल डीएनए' गोळा केला.

या 'डीएनए'ची तुलना सध्याच्या जिवंत मगरींच्या ऊतींच्या नमुन्यांशी करण्यात आली. चाचणीत असे आढळले की, सेशेल्समधील मगरींचे जेनेटिक मार्कर्स हे खाडीतील मगरींशी तंतोतंत जुळतात. या संशोधनामुळे हे सिद्ध झाले आहे की, मानवाने सेशेल्समधील मगरींचा वंश संपवण्यापूर्वी, या प्रजातीचा विस्तार पूर्व ते पश्चिम असा तब्बल ७,५०० मैलांपर्यंत (१२,००० कि.मी.) पसरलेला होता. आज या मगरी प्रामुख्याने भारत, आग्नेय आशिया, ऑस्ट्रेलिया आणि पश्चिम पॅसिफिक बेटांवर आढळतात. ◆◆◆



गुरुवाणी – १०५
'सिद्ध' होण्याचा अधिकार

आपल्या तन,मन, वचन, भावनांमध्ये विनय आणला पाहिजे. स्वतःच्या आतील विनयाची अनुभूती तीर्थंकरांच्या समवशरणमध्ये प्रत्येकाला येत होती. प्रभू सांगतात, 'जो स्वतःचा अपमान करतो तो दुसऱ्यांचाही अपमान करतो'. प्रभुंनी वरदानाचा वर्षाव केला. दुःखात तुम्ही समाधानी, शांत राहिलात तर दुःखच तुमच्यासाठी शक्तीचा स्त्रोत बनेल. कोणतेही संकट, प्रतिकूल परिस्थिती तुम्हाला तोडण्यासाठी नाही तर मजबूत करण्यासाठी येते. जीवनात येणाऱ्या सर्व संकटांसाठी स्वतःला सज्ज करा. मान अपमान, अनुकुलता, प्रतिकुलता असो कोणत्याही परिस्थितीत विनयाचा मार्ग सोडू नका. या मार्गावरून तुमचे लक्ष विचलित करण्यासाठी अनेक प्रलोभने, आकर्षणं समोर येतील. पण तुम्ही विचलित व्हायचे नाही. तुमच्या आतील सुप्त करूणा स्त्रोत जागृत होईल. जेव्हा तुम्ही स्वतःला परम बनवाल तेव्हा तुम्हाला मजबूर झाल्याचे वाटणार नाही. आतील श्रद्धा हिऱ्यासारखी चकाकणारी हवी. कधीही अपथ्य सेवन करू नका, सुखसुविधांविषयी आसक्ती ठेऊ नका, मूळ पुंजी गमावू नका. तुमच्यातील आस्था सुरक्षित ठेवली तर तुम्ही स्वतःला आणि तुमच्या सहयोगींनाही श्रेष्ठ बनवाल. प्रभूंच्या अंतिम देशनात दिव्य परिषद तल्लीन झाली होती. प्रत्येक समयी चेतना जागृत ठेवा. संसारात आत्मा अजीव असलेल्या वस्तू, कपडे अशा गोष्टींची पूजा करतो. आपल्या मूळांची भक्ती करत नाही. प्रभू याच भक्तीचे वरदान देतात. स्पेस आणि टाईम असलेल्या आकाशात प्रचंड शक्ती असते. आईन्स्टाईनने सुद्धा हेच विज्ञान सांगितले. परमाणु अतिक्षूक्ष्म असतात, ज्याचे विघटन करता येत नाही. जैन दर्शनमध्ये परमाणुंच्या समूहाला स्कंद म्हणतात. स्कंदाचे विच्छेदन होऊ शकते. अनादी काळापासून आपण कधी एखाद्या गोष्टीवर प्रेम करत असतो तर कधी त्याच गोष्टीचा तिरस्कार करत असतो. आज सुगंध आवडत असला तरी पूर्व जन्मात आपल्याला दुर्गंधीही आवडत असेल. मच्छीमाराला माशाचा गंध दुर्गंधी नसते. पण एखाद्या माळयाला माशाचा गंध दुर्गंधी वाटतो. आपण जेव्हा एखाद्याला चांगले वाईट म्हणतो तेव्हा आपल्या आत तसे ब्लॉकेज तयार होतात. पॉझिटिव्ह भक्तीला प्रेम तर निगेटिव्ह भक्तीला द्वेष म्हणतात. संकल्प करा, कळत नकळत ज्या विषयी लाईक डिसलाईक केले आहे, त्या भावनेचे मी मनातून विसर्जन करतो. तीर्थंकर परमात्म्याचा धर्म समजून घेतला तर कोणीही, कसाही व्यक्ती सिद्ध होऊ शकतो. भगवान महावीर एकमेव आहेत जे सांगतात की, मोक्षप्राप्तीवर कोणत्याही ठराविक परंपरेचा अधिकार नाही. जे पापमुक्त, कषायमुक्त होतात ते मोक्ष गतीत जाऊ शकतात. सिद्ध होणे हा सगळ्यांचा अधिकार आहे.

– उपाध्याय प्रवर
पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.




गुरुवाणी – १०६
'सत्य' दर्शन

जीव आणि अजीवचे स्वतंत्र अस्तित्व समजले पाहिजे. आपली वस्तूवर जितकी श्रद्धा असते तितकी व्यक्तीवर नसते. शरीरात ताप आला तर लगेच उपचार केले जातात. पण आत्म्याला राग, अहंकाराचा ताप आला तर त्यावर उपचार केले जात नाहीत. आत्म्याची नेहमी उपेक्षा केली जाते. ज्याची उपेक्षा करतो त्याला आपण शत्रू बनवतो. तीर्थंकरांच्या शिखर अध्यायात केवळ सत्याचे विवेचन आहे. जैन आगममध्ये विज्ञानावरही खूप सखोल चर्चा केली आहे. चौथ्या ते सातव्या नारकीत अतिशय दुःखी, कष्टमय पर्यावरण असते. तिथे देवता सुद्धा प्रवेश करण्यास कचरतात. आयुष्य गतीचे बंध एका क्षणात होते. पण त्याची बनण्याची प्रक्रिया निरंतर चालू असते.

फटाक्यांच्या आवाजाने पक्षांना खूप पिडा होते. पण हे माहीत असतानाही फटाके वाजवून आनंद घेणे चुकीचे असते. ही वृत्ती घातक असते. म्हणून जैन दर्शन सांगते, 'दुसऱ्यांच्या दुःखात आनंदी होणार नाही' असा संकल्प हवा. 'मी दुसऱ्यांचे दुःख वाढवणार नाही' अशी भावना तीर्थंकरांच्या चरणी समर्पित करा. लाकूड तोडण्यासाठी अनेक घाव घालावे लागतात. निरंतर प्रक्रिया सुरू असल्याने लाकूड तुटते. प्रभूला आर्जव करा, माझ्या आत दुसऱ्यांच्या प्रती जो उपेक्षेचा भाव असतो त्याची मी आलोचना करतो, निंदा करतो. मनुष्य गतीची दुष्ट कर्मामुळे दुर्गती होते आणि चांगले कर्म केल्यास सुगती होते. मनुष्याचे एका शरीरात एकच आयुष्य असते. जगात अनेक विचार असताना तुम्ही जन्माने जैन बनलात पण तत्वज्ञानाने जैन बनले पाहिजे. हे तत्वज्ञान उत्तराध्ययन सूत्रात सांगितले आहे. तुम्ही आपल्या तत्वज्ञानापासून दूर राहिलात तर कोणीही तुम्हाला चुकीच्या मार्गाने नेऊ शकतो. एक अनोखा धर्म तुम्हाला मिळाला आहे,जो जगाला दिशा देणारा आहे. आपण निश्चित करायचे आहे की, आंब्याचे झाड वाढवायचे की बाभळीचे झाड वाढवायचे. म्हणून 'जैनिझम' स्वतः समजूत घेऊन ते इतरांपर्यंतही पोहोचवले पाहिजे. जैन दर्शन 'सत्य दर्शन' आहे. ते असे कधी सांगत नाही की, तुम्ही कितीही चांगले आचरण केले पण तुम्ही आमचा धर्म कबूल नाही केला तर देवगतीत जाणार नाहीत. जैन दर्शन सांगते, फक्त आणि फक्त तुम्ही जीवन कसे जगलात यावरच तुमची देवगती किंवा नरकगती अवलंबून असते, मग तुम्ही कोणत्याही धर्माचे असाल.


– उपाध्याय प्रवर
पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



गुरुवाणी – १०७
निर्वाण कल्याणक..

अंतिम देसना शिखरावर पोहचत असताना तीर्थंकरांनी इंद्रभूती गौतमला देवशर्मा ब्राह्मणाकडे धर्माचे वरदान देण्यासाठी पाठवले. देवशर्माच्या आत भक्तीचा जागर झाला. दोघे परमात्म्याच्या दर्शनासाठी निघाले. सूर्यास्त होत असताना इंद्रभूती गौतम एका पिंपळाच्या झाडाखाली थांबले. ते तिकडे सुरू असलेल्या समवशरणमध्ये, प्रभूमध्ये तल्लीन झाले. आपलेच खूप काळापासून संचित केलेले तीर्थंकर नामकर्माचे तेजस्वी शरीर सिद्ध स्वरुपात सहज होण्यासाठी तीर्थंकरांची यात्रा शिखरावर पोहोचली होती. इंद्रभूती गौतम त्या दिव्य परिषदेची अनुभूती घेत आहेत. समग्र विश्वाचे अर्थ सिद्ध होत आहे. सातही नक्षत्रांचा चंद्राला स्पर्श होत आहे. प्रभू कृपा वर्षाव करत आहे. संपूर्ण विश्व पुनित होत आहे. त्यांना अनुभूती आली, प्रभूंची काया निस्पंद होत आहे. वचन थांबले आहेत. सूक्ष्म योगाची अनुभूती येत आहे. डोळ्यांची पापणी लवत असताना प्रलय आला. इंद्रभूती गौतमला कळले, काया आहे पण कायेचा स्वामी नाही. विग्रह आहे पण विग्रह गीत नाहीय. शरीर आहे पण चेतना नाही. तीर्थंकर नामकर्मचे शरीर पूर्ण विश्वव्यापी झाले आहे. दिव्य समवशरणमध्ये वरदानाचा वर्षाव बंद झाला आहे. सुधर्मा स्वामींनाही अनुभूती झाली, वाणी नाही, वरदान नाही. डोळे उघडले तर प्रभूंचा दिव्य विग्रह दिसला. तीर्थंकरांचे निर्वाण कल्याणक झाले होते. सुधर्मा स्वामींनी इंद्राला इंद्रभूती गौतमचा शोध घेण्यास सांगितले कारण आता तेच आहेत प्रभूंचे परम स्वरूप. त्यांना आणण्यासाठी इंद्र पोहोचले. इंद्रभूती गौतमचा विलाप, डोळ्यातील अश्रूधारा पाहून इंद्र स्तब्ध झाले. इंद्रभूती गौतम भावना व्यक्त करतात, प्रभू नाहीत तर माझ्या जीवनाचे प्रयोजनच राहत नाही. सुधर्मा स्वामींनी सांगितल्याप्रमाणे इंद्र इंद्रभूती गौतमला प्रभू वचनाची आठवण करून देतात. त्यांना प्रभू वाणी आठवली. ते प्रभूमध्ये पूर्ण तन्मय झाले व त्यांना केवल ज्ञान प्राप्त झाले. गौतम, जे आधी प्रभूंचे झाले आणि नंतर स्वतः प्रभू झाले. इंद्र इंद्रभूती गौतमला घेऊन आले. सुधर्मा स्वामी त्यांना प्रभूची जागा घेण्याचा आग्रह करतात. पण इंद्रभूती गौतम म्हणतात, 'जगाला प्रभूशी जोडणाऱ्या व्यक्तीची गरज आहे. हे काम केवळ तूच करू शकतो. म्हणून तू आजपासून प्रभूंचा उत्तराधिकारी आहेस'. इंद्रानेही मग सुधर्मा स्वामींच्या डोक्यावर छत्र धरले.

– उपाध्याय प्रवर
पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



गुरुवाणी – १०८
उपकारीसमोर अहंकार नको

रामाने ग्रेट असणे आणि लक्ष्मण यांच्याबरोबर जाणे सहज स्वीकारता येते. पण लक्ष्मणने ग्रेट होणे आणि रामाने त्याच्या बरोबर जाणे पचनी पडत नाही. भगवान ऋषभदेव यांनी एकेदिवशी घोषणा केली की, त्यांचा नातू मरीचि वासुदेव, चक्रवर्ती, तीर्थंकर बनेल. परंतु मरिचि याविषयी कृतज्ञ न बंनता स्वतःला आजोबा, वडीलांपेक्षा ग्रेट समजू लागला. ही एकच भावना त्याच्यात नात्यांत कायमस्वरूपी गाठ निर्माण करणारी ठरली. यामुळे तीर्थंकरांची आत्मा कोणत्याही जन्मी छोटे भाऊ म्हणुनच जन्मली. आपल्या उपकारीला स्वतःपेक्षा कधी श्रेष्ठ समजू नका. उपकारीसमोर कधी अहंकारी बनू नका. वर्धमान महावीरांचा जन्म झाल्यावर त्यांची बहीण सुंदर्शना, थोरले बंधू नंदिवर्धन खूप आनंदीत झाले. पण नंतर त्यांच्या लक्षात आले सगळे आता लहानग्या वर्धमान कडेच जास्त देतात. सगळे मोठे झाले.

सर्वजण छोट्या वर्धमानचेच लाड करू लागले. हे पाहून नंदिवर्धनला आनंदही व्हायचा आणि मनात असूयाही निर्माण व्हायची. त्याकाळी संपूर्ण व्यवस्था ब्राह्मणांच्या हातात होती. राजसत्तेचेही त्यांच्या समोर काही चालत नसे. नंदिवर्धन अशा वातावरणात युवराज बनले. वर्धमान मात्र या गोष्टींपासून अलिप्तच होते. पण जिथे अन्याय अत्याचार दिसायचा तिथे वर्धमान आक्षेप घ्यायचा, विरोध करायचा. वर्धमानने विचार केला, मनुष्य अत्याचार का सहन करतो? त्याला उत्तर मिळाले, भीतीमुळे व्यक्ती अन्याय, अत्याचार सहन करतो. या भीतीपासून मुक्त झालो तरच अन्यायाचा प्रतिकार केला जाईल. आई म्हणते, वर्धमान तू प्रश्न विचारण्यासाठी नाही तर उत्तर देण्यासाठी समर्थ बन. कालांतराने वर्धमान दीक्षा घेतात व विहारासाठी निघतात. इकडे राजमहालात नंदिवर्धन भावाच्या विचाराने अस्वस्थ होतो. त्याला वेळोवेळी वर्धमानची वाटचाल कळत असते. त्यांचे कष्ट समजल्यावर तो स्वतःला दोष देत राहतो. पुढे वर्धमान केवलज्ञानी झाले. नंदिवर्धन म्हणतात, वर्धमान महावीर इतरांना मोक्ष मार्ग दाखवतात पण मला नाही दाखवू शकत, मी महापापी आहे. मी तुझा बंधू नाही बनू शकलो. तीर्थंकरांच्या निर्वाण कल्याणकाची वार्ता कळली आणि नंदिवर्धनने मोठा विलाप केला. सुदर्शनाला नंदिवर्धनची अवस्था कळली. ती त्याच्याकडे येते. नंदिवर्धन म्हणतो, मी वर्धमानचा बंधू नाही बनू शकलो. सुदर्शना सांगते, बंधू तू एकदा तुझ्या हृदयात बघ, आतमध्ये तुला वर्धमान दिसतील. नंदिवर्धन अंतचक्षूने पाहतो तर त्याला हसतमुख वर्धमान दिसतात. ते आनंदीत होतात. तो वर्धमानाची भक्ती सुरू करतो. तोच दिवस आहे, भाऊबीज.

– उपाध्याय प्रवर
पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



गुरुवाणी – १०९
पूर्वतयारीचे महत्त्व

राजा प्रदेशीची चरित्र कथा आयुष्यात खूप शिकवणारी आहे. ज्याला संतांची निंदा करणे, चोरी करणे, खोटे बोलण्यात आनंद मिळतो अशा व्यक्तीलाही बदलता येते. परिवर्तनासाठी गुरू आवश्यक असतोच पण गुरूकडे नेणारा मित्रही गरजेचा असतो. प्रदेशीचा असा मित्र असतो चित्रसारथी. तो मोठ्या भावासारखा असतो. प्रदेशी या मित्राला परराज्यात हालहवाल जाणून घेण्यासाठी पाठवतो. चित्र सारथी असताना त्या नगरीत केशीश्रमणांचे आगमन होते. ते महाज्ञानी होते, परिवर्तनकारी प्रवचनात ते पारंगत होते. त्यांच्या आगमनाने नगरीत उत्सवाचं वातावरण तयार झाले. चित्र सारथी आश्चर्यचकित होतो. सगळे लोक केशीश्रमणच्या दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. चित्र सारथीसाठी हा माहोल नवीन असतो. कारण त्याच्या नगरीत असा माहोल कधीच नसतो.

पण इथला सगळा माहोल पाहून तो सुद्धा सहज पहायला तिथे जातो. आपणही ज्या दुकानात गर्दी असते तिथे जातोच. चित्र सारथी केशीश्रमणची परिषद पाहून मोहित होतो. तो सुद्धा समूहाचे अनुकरण करतो. त्याच्यातील भाव जागृत होण्यास सुरुवात झाली. तो केशीश्रमण जवळ गेला. त्याला वेगळीच अनुभुती आली. तो सुद्धा श्रद्धावान झाला. त्याने भगवान पार्श्वनाथ धर्म स्वीकारला. तो नित्यनेमाने केशीश्रमणच्या दर्शनासाठी जायला लागला व त्याला आत्मबोध होत गेला. त्याला वाटले राजा प्रदेशीतही असे परिवर्तन झाले पाहिजे. यासाठी तो केशीश्रमणला विनंती करतो, 'तुम्ही आमच्या नगरीत या'. ते स्पष्ट सांगतात, तुझी नगरी आम्ही येण्यासाठी योग्य नाही. तुझी नगरी सुंदर असेल पण तिथे क्रूर डाकू राज्य करत आहे. तरीही चित्र सारथी विनंती करत राहतो. अखेर केशीश्रमण म्हणतात, योग्य वेळी मी येईल. चित्र सारथी आनंदीत होतो, आता माझ्या मित्रातही परिवर्तन होईल. आपल्या नगरीत संतांच्या स्वागताची पूर्वतयारी सुरू करतो. परिवर्तनासाठी पूर्वतयारी अत्यावश्यक असते. शस्त्रक्रिया करण्याआधी सुद्धा पूर्वतयारी गरजेची असते. चित्र सारथी आपल्याला आलेल्या अनुभूतीची माहिती राजा प्रदेशीला देत नाही. कारण आपण सांगून उपयोग होणार नाही हे त्याला माहीत होते. दुसरीकडे त्याने माहोल तयार केला होता. एक दिवस केशीश्रमण नगरीत आले. चित्र सारथीसह सगळे लोक स्वागताला गेले. त्यांचे प्रवचन कार्यक्रम सुरू झाले. केशीश्रमण म्हणतात, जो ऐकू इच्छितो त्यालाच मी प्रवचन देऊ शकतो. चित्र सारथी म्हणतो, राजा प्रदेशी ऐकायला नक्कीच येईल, फक्त तुम्ही त्यावेळी अद्भुत प्रवचन द्या.

– उपाध्याय प्रवर
पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.



गुरुवाणी – ११०
सदाचाराकडे नेणारे कौशल्य

चित्र सारथी केशीश्रमण यांना विनंती करतो, 'तुम्ही राजा प्रदेशीला धर्मोपदेश केला तर राजा, प्रजा, पशुपक्ष्यांचेही कल्याण होईल. मी राजा प्रदेशीला इथे आणण्याची व्यवस्था करतो. फक्त तुम्ही त्याला उपदेश द्या. नंतर चित्र सारथी राजाकडे जातो व म्हणतो, 'तुम्ही जे माझ्याकडे घोडे दिले होते, ते ट्रेन झाले आहेत. त्यांना बघायला चला'. दोघे रथातून निघतात. धर्मद्वेषीला धर्मसभेत आणण्यासाठी चित्र सारथी आपले कौशल्य वापरतो. आपण किमान धर्म प्रेमीला तरी धर्मसभेत आणण्यासाठी कौशल्य वापरले पाहिजे. अनेक जण इच्छा असूनही केवळ नेणारा कोणी नाही म्हणून येत नाहीत. आगम सांगते, क्रूरतम राजा प्रदेशीला आणले जाऊ शकते तर इतर कोणालाही आणले जाऊ शकते'. चित्र सारथी रथ खूप दूर नेतो व केशी श्रमणच्या धर्मसभेच्या ठिकाणी थांबवतो. तो राजाला तिथल्या वनराईत आराम करण्यास सांगतो. धर्मसभेतून येणारा उपदेशाचा आवाज ऐकून राजा प्रदेशी चित्र सारथीला म्हणतो, 'हे सगळे मूर्ख लोक आहेत. ते मूर्खांचीच भक्ती करत आहेत'. चित्र सारथी शांतपणे ऐकून घेतो. पण राजा प्रदेशी केशीश्रमणचा आवाज ऐकून थोडा आकर्षित होतो. त्याच्या मनात तिथे जाण्याची इच्छा जागृत होते. पण चित्र सारथी त्याला फोर्स करत नाही. त्याने फक्त माहोल तयार केला होता. एखाद्याला चुकीच्या मार्गावर नेण्यात खूप लोकं मास्टर असतात. पण सदाचाराच्या मार्गावर नेणारे मास्टर खूप कमी असतात. अखेर राजा प्रदेशी केशी श्रमणसमोर जाऊन थेट बातचीत सुरू करतो. तो म्हणतो, तुम्ही सांगता आत्मा व शरीर वेगवेगळे आहेत. पण हे मिथ्या आहे. मी अनेक प्रयोग केलेत. अपराध्याला मृत्युदंड देताना मी त्याच्या शरीराचे अनेक छोटे छोटे तुकडे केले पण मला कुठंही आत्मा दिसली नाही. केशी श्रमण स्पष्टपणे म्हणतात, तू मूर्ख आहेस. माचिस पेटवण्यासाठी त्याचा गुल घासावा लागतो. तो तोडला तर अग्नी प्रज्वलित होत नाही. तू माचिस तोडून अग्नी प्रज्वलित होण्याची अपेक्षा करतोय, म्हणून तू मूर्ख आहेस. राजा प्रदेशी म्हणतो, मी आणखी एक प्रयोग केला. 'मी एकाला पूर्ण हवाबंद पेटीत बंद केले. काही दिवसांनी मी पेटी उघडून पाहिली तर व्यक्ती मृत झाला होता, पण पेटीला कुठेही छेद पडलेला नव्हता. त्याच्या शरीराला आळ्या लागल्या होत्या. त्या शरीरात आत्मा असेल तर ती बाहेर कुठून पडली? म्हणजेच शरीरात आत्मा नसते, हे माझे म्हणणे खरं आहे'.

– उपाध्याय प्रवर
पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

ऐन दिवाळी सणाच्या काळात चोरट्यांचे असेही 'लक्ष्मी पूजन'

जिल्हाभरात चोऱ्या, घरफोड्या करत, लाखोंचा ऐवज केला लंपास, बस प्रवासातही 'हात सफाई'

नगर – दिवाळी सण नुकताच साजरा झाला. वसू बारसे पासून ते धनत्रयोदशी, नरकचतुर्थी (लक्ष्मीपूजन), बलीप्रतिपदा (पाडवा) आणि भाऊबीज अशा या सुमारे आठवडा भर चाललेल्या उत्सवाची ११ नोव्हेंबरला सांगता झाली. मात्र या आनंदाच्या सणात अनेकांचे चांगलेच 'दिवाळे' निघल्याच्या घटनाही आता समोर येत आहेत. या काळात सर्वांनी लक्ष्मी पूजन केले. त्यात चोरटेही मागे राहिले नाहीत. त्यांनीही अनोख्या पद्धतीने 'लक्ष्मी पूजन' केलेच. मात्र ते जिल्हाभरात ठिकठिकाणी चोऱ्या, घरफोड्या करत सोन्या चांदीचे दागिने, रोख रक्कम असा लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याचे पोलीस दप्तरी दाखल झालेल्या गुन्हयांवरून दिसून आले.

दिवाळी हा वर्षातील महत्वाचा सण असल्याने नोकरी, व्यवसायामुळे बाहेरगावी असलेले अनेकजन आपापल्या गावी जातात. त्यामुळे बरीच घरे बंद असतात. अशा घरावर चोरट्यांचे बारीक लक्ष असते. या सणासुदीच्या काळात नागरिक गावी गेल्यामुळे किंवा पूजा आटोपून गाढ झोपेत असल्याचा गैरफायदा घेत चोऱ्यांच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. दिवाळीच्या सणात सर्वसामान्य नागरिक घरात लक्ष्मीपूजन करत असताना, चोरट्यांनी मात्र बंद घरे आणि देवघरातील दागिने–रोकड लंपास करून आपले 'लक्ष्मी पूजन' साजरे केले आहे. इतकेच नव्हे तर दिवाळी झाली की अनेक महिला दुसऱ्या दिवशी भाऊबीजेसाठी माहेरच्या प्रवासाला निघतात. सोबत माहेरी मिरविण्यासाठी दागिनेही बरोबर घेवून जातात. चोरटे यात फक्त पुरुषच नव्हे तर महिलांच्या टोळ्या असल्याचेही अनेकदा समोर आलेले आहे. ते या संधीचा फायदा घेत बस प्रवासातही गर्दीमध्ये दागिने, रोख रकमेच्या चोऱ्या करतात. हा दरवर्षीचा अनुभव आहेच, तो या वर्षीही आला आहे. या वर्षी जिल्ह्यात वसूबारस ते भाऊबीज या कालावधीत जिल्ह्यात झालेल्या चोऱ्यांच्या विविध पोलीस ठाण्यांमध्ये झालेल्या नोंदी पुढील प्रमाणे आहेत.

नगर शहरातील व्यापारी नरेंद्र रायबा चव्हाण (वय ७१, रा. यशवंत कॉलनी, साईदीप हॉस्पिटल समोर, अहिल्यानगर) यांच्या घरातून रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी ८५ हजारांचे दागिने व २ मोबाईल चोरून नेले आहेत, या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत शंतनू मधुकर भावे (वय ६५, रा. धनाजी नगर, नोबेल हॉस्पिटल जवळ, गायकवाड मळा, सावेडी) यांच्या घरातून ५ हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसऱ्या घटनेत मनोज नागेश आडीगोपुला (वय ३२, रा. किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) यांच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी ५ लाख रुपयांचे किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौथ्या घटनेत नेवासा तालुक्यातील पानेगाव येथील खळवाडी येथील राहणारे हितेश संजय जंगले यांच्या घरातून ४० हजार रुपयांची रोकड रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाचव्या घटनेत संगमनेर तालुक्यातील साळीवाडा येथील जैन मंदिर येथून ९० हजार रुपये किमतीचे विविध प्रकारचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सचिन यशवंतीलाल शहा (वय ५६) यांनी संगमनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे

बस प्रवासात झाल्या पाच ठिकाणी चोऱ्या

या दिवाळी सणाच्या दरम्यान बस प्रवासामध्ये पाच ठिकाणी चोऱ्या झाल्या आहेत. यातील एक फिर्याद दिपाली विलास पठारे (वय ३६, रा. कोल्हार, ता. राहुरी) यांनी दिली आहे. त्या १० नोव्हेंबर रोजी सकाळी एसटी बसने कोल्हारहून नगर कडे येत असताना सावेडी नाका येथे त्यांच्या जवळील ४९ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहेत. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत कडीत खुर्द, ता. श्रीरामपूर येथील आदिती विश्वजीत गागरे (वय २९) या कोल्हार ते राहता या दरम्यान बस प्रवास करत असताना १०नोव्हेंबर रोजी सकाळी त्यांच्या जवळील पर्स मधील ५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने तसेच चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख४३ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

तिसऱ्या घटनेत विजयनगर (ता. पाथर्डी) येथील रहिवासी अर्चना मच्छिंद्र शेळके (वय ३५) या बीड ते पुणे याशिवाई बसने प्रवास करत असताना त्यांच्या पर्समधील १ लाख २३ हजार रुपये किमतीचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना १० नोव्हेंबर रोजी सकाळी घडली आहे. याबाबत पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौथ्या घटनेत अहिल्यानगरच्या माळीवाडा येथील रहिवासी सौ. कल्याणी संतोष तनपुरे (वय ४५) या अंगणवाडी सेविका या राहुरी ते राहुरी फॅक्टरी बस ने प्रवास करत असताना त्यांच्या जवळील पर्स मधील ८० हजार ७०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरीला गेला आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाचव्या घटनेत गणेश पेठ पुणे येथील महेश पुखराज खंडेलाल हे बसने प्रवास करत असताना सुपा बसस्थानक ते टोल नाका या दरम्यान त्यांच्या जवळील २५ हजार रुपयांचे दागिने दिवसाढवळ्या चोरीला गेले आहेत. या प्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देवघरातील लक्ष्मीपूजनाच्या पैशांची चोरी

राहुरी येथील गोकुळ कॉलनी राहणारे रवींद्र भागवत भारती (वय ४७ यांनी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी देवघरात लक्ष्मीपूजन केलेले होते. त्या ठिकाणी त्यांनी लक्ष्मीपूजनासाठी १० हजार रुपयांची रोकड ठेवलेली होती. दुसऱ्या दिवशी पहाटे पाचच्या सुमारास नळाला पाणी सुटले म्हणून दोघे पती–पत्नी दरवाजा उघडा ठेवून पाणी भरण्यासाठी बाहेर गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करून देवघरातील ती १० हजार रुपयांची रोकड चोरून नेली आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देवदर्शनाला गेल्या आणि दागिने गमावले

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील वडू खुर्द येथील रहिवासी अरुणा बाळासाहेब साळुंखे (वय ६०) या ९ नोव्हेंबर रोजी सकाळी मढी येथे कानिफनाथ महाराजांच्या देवदर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी तेथे झालेल्या गर्दीत त्यांच्या गळ्यातील अडीच तोळ्यांचे सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

सावेडीत लेडीज शॉपी मधून महिलेचे सव्वा दोन तोळ्याचे मंगळसूत्र लांबवले

शहरातील सावेडी परिसरातील नंदनवन नगर भागात असणाऱ्या एका लेडीज शॉपीमध्ये चॉकलेट घेण्याच्या बहाण्याने दुकानात प्रवेश करून एका चोरट्याने दुकानात शिवणकाम करत बसलेल्या महिलेच्या गळ्यातील तब्बल १ लाख ५६ हजार ४४६ रुपये किमतीचे सव्वादोन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने ओरबाडून नेल्याची घटना १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत आशा राजेंद्र बोरा (वय ५५, रा. सावेडी, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या 'अक्षदा लेडीज शॉपी'मध्ये शिवणकाम करत असताना अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचा एक अनोळखी इसम दुकानात आला. त्याने राखाडी रंगाची हुडी आणि पाठीवर बॅग घातली होती. त्या इसमाने दुकानात येऊन फिर्यादीकडे चॉकलेट मागितले. फिर्यादी चॉकलेट देण्यासाठी वळल्या असतानाच त्या चोराने त्यांच्या गळ्यातील सव्वादोन तोळे वजनाचे, १ लाख ५६ हजार ४४६ रुपये किमतीचे सोन्याचे चेन असलेले गंठण बळचोरीने ओढून तोडले. त्यानंतर तो इसम दुकानाबाहेर आधीच मोटारसायकलवर थांबलेल्या त्याच्या साथीदारासोबत फरार झाला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी करत आहेत.

सोशल मिडीयावर पोस्ट टाकताना खबरदारी घ्या

या दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर अनेक महिलांना दागिने घातलेले, तसेच लक्ष्मीपूजन केलेले फोटो काढण्याचा मोह आवरत नाही. त्या फक्त मोबाईल मध्ये फोटो काढून थांबत नाहीत तर ते फोटो मोबाईल स्टेटस, इंस्टाग्राम स्टोरी, फेसबुक स्टोरी यावर अपलोडही करतात. आपले घरगुती फोटो त्यातही मौल्यवान दागिने, पैसे लक्ष्मी पुजनासाठी ठेवलेला मौल्यवान ऐवज सोशल मिडीयाच्या माध्यमातून सार्वजनिक करतात. त्यांना त्याची हौस वाटते, पण चोरटेही आता हुशार आंनी टेक्नोसेव्ही झालेले असल्याने ते अशी घरे बरोबर हेरतात आणि आपला हाथ साफ करतात. त्यामुळे त्या कुटुंबावर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. अशी वेळ येवूच देवू नये यासाठी महिलाच नव्हे तर कुटुंबातील प्रत्येकाने आपल्या भावनांना आवर घातला पाहिजे. सोशल मिडीयाचा वापर करताना आपण त्यावर काय पोस्ट करतोय याचे भान ठेवत खबरदारी घेतली पाहिजे. हे अतिशय गरजेचे आहे.

ज्वेलर्सच्या दुकानात ग्राहक बनून आलेल्या इसमाने लांबवले सोन्याचे दागिने

नगर – शहरातील अमरधाम रोडवरील नेप्ती रोड परिसरात असलेल्या 'लोळगे ज्वेलर्स' या दागिन्यांच्या दुकानात ग्राहक बनून आलेल्या एका अज्ञात इसमाने नजर चुकवून २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे टॉप्स लांबवल्याची घटना १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजेच्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सराफ व्यवसायिक अमोल बाळासाहेब लोळगे (वय ४०, रा. शिवाजीनगर, कल्याण रोड, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांचे कुटुंबीय शिवाजीनगर, कल्याण रोड येथे राहतात. तर त्याचे अमरधामजवळ, नेप्ती नाका येथे 'लोळगे ज्वेलर्स' नावाचे सराफ दुकान आहे.

१० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे दुकानात आले आणि सायंकाळी ५ ते ७ वाजेच्या दरम्यान कामानिमित्त नगर शहरात गेले होते. त्यानंतर ते दुकानात परत आले. व त्यांनी डिस्प्लेसाठी ठेवलेले सोन्याचे दागिने तपासले. त्यावेळी त्यांना दुकानातील लाकडी ट्रेमध्ये ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन टॉप्स कमी असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी दुकानात व्यवस्थित पाहणी केली आणि पत्नीकडे विचारपूस केली, परंतु कोणतीही माहिती मिळाली नाही.

दुकानात ग्राहक बनून आलेल्या एका अज्ञात इसमाने नजर चुकवून लाकडी ट्रेमध्ये ठेवलेले २५ हजार रुपये किमतीचे अडीच ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन टॉप्स चोरून नेल्याची खात्री पटल्यानंतर फिर्यादीने पोलीस ठाण्यात धाव घेतली.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पो. हे.कॉ. शरद वाघ करत आहेत.

घर विकणे
1RK घर विकणे आहे
प्लॉट एरिया ६२१ स्क्वे. फुट, बिल्ड अप ३८० स्क्वे. फुट
पत्ता- गणेश नगर, शंकर महाराज मठाजवळ, नगर-कल्याण रोड
8329252794
9527566833

भाड्याने देणे
दुकान भाड्याने देणे आहे.
१०० स्क्वेअर फूट
(गोडावून, ऑफिस भाजीपाला, फॅब्रिकेशन, सलून इ. करिता)
भुतकरवाडी, मारुती मंदिराशेजारी, सावेडी रोड अहिल्यानगर
8668358192

भाड्याने देणे
डॉक्टर कॉलनी येथे छोट्या कुटुंबासाठी
1BHK बंगला
भाड्याने देणे आहे
9422222238

ड्रायव्हर पाहिजे
अनुभवी आणि निर्व्यसनी
ड्रायव्हर पाहिजे
(आकर्षक पगार)
9049673565
8999789397

चाहिए
अहिल्यानगर शहर और एमआयडीसी के लिए
सिक्युरिटी गार्ड व हाऊस किंपीग चाहिए
(महिला/पुरुष)
6386633129
7020839133

ऑफिस कामासाठी मुले/मुली पाहिजेत
कॉम्प्युटरचा अनुभव असल्यास प्राधान्य
9049014260

पाहिजेत
त्वरीत अनुभवी
ड्रायव्हर व हेल्पर पाहिजे
४०७, ७०९,९०९ जनरेटर व्हॅन साठी समक्ष अर्जासह भेटावे
श्री स्वामी समर्थ जनरेटर्स अँड इलेक्ट्रिकल्स
पंचवटी नगर, नवनाथ नगर जवळ बोल्हेगाव अहिल्यानगर
9881825551

ड्रायव्हर पाहिजे
अनुभवी व निर्व्यसनी समक्ष भेटा
वेळ सायं ५ ते ८
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर
9823115157

प्राईम प्रॉपर्टी भाड्याने देणे
ठिकाण: तपोवन रोड, अहिल्यानगर
- एकूण जागा: १५,०००० चौ. फूट
- बंद गोदाम शेड: १०,००० चौ. फूट
- शेडची उंची: मध्यभागी २० फूट
- फ्रंटेज: १०० फूट
- अतिरिक्त ५ खोल्या
- आरसीसी फ्लोअरिंग
- प्रशस्त पार्किंग व्यवस्था
- मुख्य रस्त्यालगत
- हॉटेल इंद्रायणीसमोर, संभाजीनगर-नगर महामार्ग.

लॉजिस्टिक्स, वेअरहाऊस, शोरूम व फर्निचर मॉलसाठी उत्तम संधी!
9689960244



विकणे आहे
नवीन 2BHK रो-बंगलो विकणे
पत्ता- गायके मळा, आगरकर मळा जवळ स्टेशन रोड, अहिल्यानगर
9503030443
8208408054

पाहिजेत
मावशी -२
सिस्टर -२
फार्मसिस्ट -१
आर एम ओ (बालरोग तज्ज्ञ)-१
-संपर्क-
0241-2323211
9403820779

पाहिजेत
सिव्हिल इंजिनिअर
(DCE/B.E)
(अनुभवी/फ्रेशर)
नवले बिल्डर्स
गुरुपद्मा अपार्टमेंटस्
गुजरलेन, अहिल्यानगर
9326221864

त्वरित नेमणे आहे
नामांकित कंपनीमध्ये खाद्यपदार्थ मार्केटिंग करता नेमणे आहे. अनुभवी व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.
-: संपर्क :-
9421982257,
8888381144,
9421982258

सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्था मर्या.
SSGJOP
मुख्य शाखा - अर्बन बँक रोड, गुगळे मेडिकल समोर, अहिल्यानगर. फोन : २३५४२९५
शाखा : मार्केट यार्ड, अ.नगर. फोन : २४५११९५

पाहिजेत
- क्लार्क / कॅशिअर ०२
  पदवीधर, पतसंस्थेच्या कामाचा अनुभव.
- शिपाई ०२
  १०वी/१२वी, पतसंस्थेच्या कामाचा अनुभव.

इच्छुक उमेदवारांनी संपुर्ण माहितीचा अर्ज ७ दिवसाच्या आत पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात आणुन द्यावे.
चेअरमन

फ्लॅट भाड्याने देणे
शहराच्या मध्यवर्ती खिस्तगल्ली येथे
1 BHK - 1 BHK असे दोन फ्लॅट सर्व सोयीसह भाड्याने देणे आहे.

जागा भाड्याने देणे
शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठ,खिस्तगल्ली येथे 700 स्क्वे.फूट व्यावसायिक जागा व सर्व सोयींसह भाड्याने देणे आहे. रिटेल/होलसेलसाठी उपयुक्त. फर्निचरसह किंवा त्याशिवाय)
8888926208
9422227186

गाळा भाड्याणे देणे आहे
स्वस्तिक चौक गणेशवाडी येथील कल्पना पॅलेसमधील २३० स्क्वेअर फुटाचा गाळा व बस स्टॉण्डपासुन जवळ स्वस्तीक चौकातील (३५२ स्क्वे.फूट) १६ X २२ ग्राऊंड फ्लोअरची जागा गोडाऊनसाठी
भाड्याणे देणे आहे
संपर्क :-
9890027068

हेल्पर (जेन्टस्) २
१० वी वयमर्यादा १८वर्षा पुढील

बंगला विकणे / भाड्याने देणे
क्लासिक व्हीला सोसायटी, संभाजीनगर तपोवन रोड, अहिल्यानगर येथील सुसज्ज-प्रशस्त, दोन रस्ते असलेला कॉर्नरचा
2BHK
रो बंगला नं१
(एकुण जागा एक गुंठा) विकणे आहे.
तपोवन रस्त्यापासून दोन मिनिटांच्या अंतरावर हा रो-बंगला आहे.
विमल सुर्यवंशी
9881771981

CHANGE IN NAME
MY OLD NAME WAS **Rajesh Baburao Ugale** CHANGE AS NEW NAME **Rajesh Bhaurao Ugale** BOTH NAME'S ARE ONE & SAME PERSON
Aff no- 96AB 680851
date-12-11-2026

CHANGE IN NAME
MY OLD NAME WAS **Sanjay B. Tathe** CHANGE AS NEW NAME **Sanjay Bhagwan Tathe** BOTH NAME'S ARE ONE & SAME PERSON
Aff no- 96AB 680850
date-12-11-2026

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर
(पुर्णवेळ- फक्त पुरुष)
- टॅली व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक
- ३ ते ४ वर्ष अनुभव असणाऱ्यास प्राधान्य

हेल्पर (जागा -३) (फक्त पुरुष)
- १० वी, १२ वी पास/नापास
- होतकरू व गरजू मुलांना प्राधान्य

ड्रायव्हर अशोक लेलंड दोस्त गाडीवर डिलीव्हरी करण्यासाठी निर्व्यसनी, लायसन्स आवश्यक
- स्वलिखित अर्ज आणणे आवश्यक

दर्शन सेल्स
आडते बाजार, मंगलगेट पोलीस चौकीजवळ
9422220667

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

पाहिजेत
मार्केट यार्डमधील प्रतिष्ठित प्लास्टिक दुकानामध्ये खालील जागा भरणे आहे.
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
सदर क्षेत्रातील अनुभव
अर्जासह समक्ष भेटा
मे. प्रगत प्लास्टिक बारदाना
मार्केटयार्ड, मर्चंट बँकेजवळ, अहमदनगर. मो. 9423791130

गाळे भाडेतत्वावर देणे आहे
श्रीपार्वती, माऊली सभागृहासमोर, झोपडी कॅन्टीन, सावेडी रोड, अहिल्यानगर

२५० स्क्वे.फू. ग्राऊंड फ्लोअर	बँक, पतसंस्था, ऑफिस, दवाखाना इ. साठी उपयुक्त
४०० स्क्वे.फू. १ ला मजला	दुकान, ऑफिस, दवाखाना इ. साठी उपयुक्त
४०० स्क्वे.फू. १ ला मजला	ऑफिससाठी उपयुक्त

संपर्क : मो. 9730204794

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 30 ते 05 नोव्हेंबर 2026



रामायण ३ डी (हिंदी)
07:00 AM 06:15 PM
10:45 AM 10:00 PM
02:30 PM

रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 08:45 AM
11:45 AM 12:30 PM
03:30 PM 04:15 PM
07:15 PM 08:00 PM
11:00 PM 11:35 PM
10:00 AM 01:45 PM
05:30 PM 09:15 PM

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : ७,८,९ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



७ नोव्हेंबर 2026

SCREEN - 1	SCREEN - 2
10.00 AM 230/-	09.00 AM 180/-
02.00 PM 250/-	01.00 PM 200/-
06.00 PM 330/-	05.00 PM 280/-
10.00 PM 330/-	09.00 PM 280/-


८ नोव्हेंबर 2026

SCREEN - 1	SCREEN - 2
09.00 AM 230/-	09.00 AM 180/-
01.00 PM 250/-	01.00 PM 200/-
05.00 PM 330/-	05.00 PM 280/-
09.00 PM 330/-	09.00 PM 280/-

९ नोव्हेंबर 2026

SCREEN - 1	SCREEN - 2
08.00 AM 230/-	09.00 AM 180/-
11.30 PM 250/-	01.00 PM 200/-
03.00 PM 330/-	05.00 PM 280/-
06.30 PM 330/-	09.00 PM 280/-
10.00 PM 330/-	

कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर



डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

- चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
- पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
- डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
- डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
- हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
- तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन

या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
- सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
- सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

आठवे पुण्यस्मरण



कै.सौ. मिरा मदन पवार
मृत्यू-दि. १४ नोव्हेंबर २०१८
दिला आपण जीवनमंत्र जगण्याचा चंदनापरी देह झिजविला
मायेचा वेल पसरविला मनात ज्ञानदिप लाविला
नयन ओलावली पुण्यस्मरणाला...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली
दु:खांकित
मदन केशवराव पवार । यशवंत मदन पवार
जयवंत मदन पवार । सौ. शिल्पा दिपक हिंगे
समस्त पवार परिवार
नंदनवन कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेडी,अहिल्यानगर

।। १२ वे पुण्यस्मरण ।।



स्व. सौ. विजया अजय दिघे
स्व. दि. १३/११/२०१४ (नगरसेविका म.न.पा)
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला,व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..
।। आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली ।।
* दु:खांकित *
रामचंद्र गेनुजी दिघे (अण्णा,सासरे) । सौ.विमल रामचंद्र दिघे (सासु) । अजय रामचंद्र दिघे (पती)
विजय रामचंद्र दिघे (दिर) । विक्रांत मच्छिंद्र दिघे (दिर)
धनवान मच्छिंद्र दिघे (दिर) । जयकुमार अजय दिघे (मुलगा) । आकाश अजय दिघे (मुलगा)
विहान जयकुमार दिघे । संग्राम विजय दिघे । हर्षद विजय दिघे । युवराज आकाश दिघे । श्रेयांश आकाश दिघे
सौ.रेणुका विजय दिघे (जाऊबाई) । सौ.आरती जयकुमार दिघे (सुन)
सौ.स्वामिनी आकाश दिघे (सुन) । विजय शेवाळे पाटील (लोकनियुक्त सरपंच, वडगांव गुप्ता)
बाबासाहेब वाघ । संतोष दत्तात्रय कोतकर । बजरंग रासकर
समस्त दिघे परिवार
कालिकासदन, फकीरवाडा, अहिल्यानगर

८ वे पुण्यस्मरण
स्व. सुरेखा विजय लुणे
स्व. दि. १३/११/२०१८
साथ सुटली लाख मोलाची,
छाया विरली वटवृक्षाची,
ज्योत विझली आशेची,
वाट पाहतो आम्ही
आपल्या पुनः जन्माची !
सदैव तुझ्या आठवणीत...

श्रीमती. नवलबाई संपतलालजी मुथा
श्रीमती. आशा कन्हैय्यालालजी फिरोदिया
संतोष फुलचंद गांधी
संजय फुलचंद गांधी
अॅड. विजय गोकुळदास लुणे
अॅड. मयुरी लुणे गुप्ता - अर्पित गुप्ता
समस्त लुणे परिवार
ज्योत्स्ना मुनोत - सी.ए. आनंद मुनोत
चि. आयुष गांधी, चि. श्रवण गांधी, चि. शुभ गुप्ता

मयुरी लेडीज मॉल, शुभ मॉल - समस्त स्टाफ
आगरकर मळा, अहमदनगर.